# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१५ |
| वर्ष | : | पन्नासावे |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१५**

**गणपत्रिका क्रमांक : १८३**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

सुवर्णमहोत्सव १५ ऑगस्ट १९६५ ते १४ ऑगस्ट २०१५

वर्ष : पन्नासावे, अंक : पहिला चैत्र/वैशाख शके १९३७, एप्रिल २०१५

---

## *संपादकीय*

### धार्मिक सण की संकट?

कार्ल मार्क्स यांचे 'धर्म ही अफूची गोळी आहे', हे विधान सुपरिचित आहे. त्यांच्या या विधानाला युरोपमधील औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक क्रांती या दोन्हींची पार्श्वभूमी होती. आजच्या आपल्या 'सण' आणि 'उत्सवांना' आलेले 'आवाजी' आणि 'बाजारु' स्वरुप सर्वांनाच हतबल करणारे आहे. ज्यांनी आयुष्यभर तोडफोड केली असे सम्राट आणि सध्याच्या 'राष्ट्रवादी भ्रष्टाचार' आणि 'मूल्यहीन' राजकारणाचे महामेरु यांच्या अनुयायांनी या सणांचा आज ताबाच घेतलेला दिसतो. उच्च न्यायालयाच्या 'रस्त्यावरचे मंडप' आणि उत्सवातील 'ध्वनिप्रदूषण' या संदर्भात आपले 'संस्कृती' मंत्री आणि त्यांचे 'स्वकीय' आणि 'आप्त' यांनी सर्वच माध्यमांतून या सणांच्या आजच्या स्वरुपाचे केलेले छुपे समर्थन थक्क करणारे आहे, मार्क्स किती दूरदृष्टीचा विचारवंत होता यावर त्यातून शिक्कामोर्तबच झाले आहे.

युरोपमध्ये प्रबोधनयुगाची (Renaissance) सुरुवात ही १३ व्या, १४ व्या शतकातच झाली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरील तसेच राज्ययंत्रणेवरील ख्रिस्ती धर्म आणि चर्चचा पगडा हा नुसता जाचकच नाही तर असह्य होऊ लागला होता. कोपर्निकस, गॅलिलिओ, ब्रुनो यांची निसर्गासंबंधीची निरीक्षणे ही बायबल वचनांच्या विरोधात जात होती. 'धर्मवचने' आणि 'वास्तव' यांमधील विसंगती आणि विरोधाभास हा नेहमीच नवीन विचारांना जन्म देतो. परंपरागत ख्रिश्चॅनिटीच्या संदर्भात हेच होऊन १५ व्या शतकात प्रोटेस्टंट पंथ जन्माला आला. कॉंस्टॅंटिनोपोलच्या राजांनी तिसऱ्या शतकातच ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. त्या वेळी प्रचलित असलेल्या पॅगन जीवनपद्धतीशी त्यांचा संघर्ष होतच होता, आणि पुढील शतकांमध्ये खिश्चॅनिटीमध्येही अनेक पंथ निर्माण

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बॅंक | शाखा | खाते क्र. | बॅंक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बॅंक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | 10884930955 | SBIN 0009056 |
| ठाणे जनता सहकारी बॅंक TJSB | खोपट, ठाणे (प.) | 009110100016689 | TJSB 0000009 |
| ठाणे भारत सहकारी बॅंक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | 002115000024520 | TBSB 0000002 |

भारतीय स्टेट बॅंक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बॅंकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बॅंकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

<u>देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.</u>

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८ ०६४५ (रविवारी बंद) येथे **<u>फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.</u>**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र : २५४७२००५, भ.क्र: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**<u>- संपादक</u>**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचितो श्रीशिवमानसपूजा। | ५ |
| संतप्रणित ''नामस्मरणमहिमा'' | ६ |
| गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष | ९ |
| वामनाची गोष्ट | १२ |
| चमत्कार | १८ |
| कौटिलीय अर्थशास्त्राची रचना आणि विषय | २१ |
| ''ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म'' | २३ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ५०

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

श्री. तुलसीदास रा. कामत, गोवा

**विशेष देणगी**

श्रीमती सरोज वामन रानडे, पुणे रु.१०,०००/-

**देणगी जानेवारी ते मार्च २०१५**

डॉ. श्रीकृष्ण ढगे, कऱ्हाड रु.५००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख २२ वा

जल्पन्ति मूढास्तु गुणैर्विहीनः॥[३०१]
संपूर्णकुम्भो न करोति शब्दमर्धोघटो घोषमुपैति नूनम्।
विद्वान् कुलीनो न करोति गर्वं जल्पन्ति मूढा...॥

संपूर्ण पाण्याने भरलेल्या हंड्यातून आवाज येत नाही, अर्ध्यातून येतो. विद्वान कुलीन माणसे गर्व करीत नाहीत, अर्धवट ज्ञान असलेले मात्र गर्वाने वायफळ बडबडतात. म्हटलेच आहे की 'उथळ पाण्याला खळखळाट फार.'

दुग्धेन-दग्धवदनस्तक्रंफुत्कृत्य पामरः पिबति॥[३०२]

सुभाषिताची पहिली ओळ : दुर्जनदूषितमनसां पुंसां सूजनेऽपि नास्ति विश्वासः।

एकदा दुर्जनाने एखाद्याच्या मनात विष कालवले की त्याचा सज्जनावरही विश्वास बसत नाही. दुधाने तोंड पोळले की माणूस ताकसुद्धा फुंकून पितो.

निःसारस्य पदार्थस्य प्रायेणाडम्बरो महान्।[३०३]

दुसरी ओळ : न सुवर्णे ध्वनिस्तादृक यादृक् कांस्ये प्रजायते॥

ज्यांच्याजवळ विशेष काहीच नसते असे लोक डामडौल करून आपण मोठे आहोत असे दर्शविण्याचा प्रयत्न करतात. कांस्य धातूमध्ये जसा नाद असतो (हा धातू घंटेसाठी वापरतात) तसा नाद सोन्यात नसतो.

धंदा भडभुंज्याचा आणि ऐट बादशाहची
न लभन्ते विनोद्योगं जन्तवः सम्पदां पदम्।[३०४]

माणसाला उद्योग केल्याशिवाय संपत्ती अगर स्थान मिळू शकत नाही.

दुसरी ओळ : सुराः क्षीरोदधिक्षोभमनुभूयामृतं पपुः॥

देवांनादेखील समुद्रमन्थन केल्यानंतरच अमृत प्यायला मिळाले, प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.

नलिकागतमपि कुटिलं न भवति सरलं शुनः पुच्छम्।[३०५]

कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच. किंवा - कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडूच.

दुसरी ओळ - वद्वत् खलजनस्यहृदयं बोधितमपि नैव याति माधुर्यम्॥

त्याप्रमाणे दुष्टांना कितीही उपदेश केला, समजावून सांगितले तरी त्यांच्या हृदयात गोडवा निर्माण होत नाही.

न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति।[३०६]

स्त्रीला एकटे कधीही सोडू नये.

पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने।
पुत्रश्च स्थविरे भावे, न स्त्री ...॥

कुमारी असताना स्त्रीचे वडील रक्षण करतात. तारुण्यात पती रक्षण करतो व वार्धक्यात मुलगा. पण ह्या सुभाषिताच्या अंशाचा चुकिचा अर्थ लावला जातो व स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये असा दुरार्थ लावला जातो.

(पृष्ठ १७ वर)

लेख ५ वा

श्लोक ५ वा :- करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम्।
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे श्रीमहादेवशंभो ॥५॥

शब्दार्थ - कर -हात, नयन-डोळा, चरण-पाय, मानस-मन, वाक्-बोलणे, विहितम्-जाणून, अविहितम्- अजाणपणे, काय-शरीर, श्रवण-कान, क्षमस्व-क्षमा कर, अपराधम्-गुन्हा, दोष, पाप.

समास - १) करचरणकृतं - करेण वा चरणेन वा कृतम् तृ.त ।

हाताने किंवा पायाने केलेला अपराध.

२) वाक्कायजं - वाचः कायायाः वा जातम् उप.त। बोलझयात वा शरीराने प्रमाद घडला असेल (कोणा पूज्य माणसाला पाय लागणे).

३) कर्मजं - कर्मणः जातम् - कृतीत एखादा प्रमाद घडला असेल.

४) श्रवणनयनजं - श्रवणात् वा नयनात् जातं- उप.त. । ऐकण्यात किंवा पाहाण्यात अपराध झाला असेल.

५) मानसं - मनसः जातं - मनाने आलेला (तद्धित).

६) करुणाब्धे - करुणायाः अब्धिः ष.त. संबोधनरुप हे दयेच्या सागरा.

अन्वयः- हे करुणाब्धे शंभो, कर-चरण-कृतं, वाक्-कायजं, वा श्रवण-नयनजं, वा मानसं वा विहितं वा अविहितम् सर्वम् एतत् क्षमस्व । हे श्रीमहादेव शंभो त्वं जय, जय ।

भाषांतर :- हे दयासागरा, शंभो, हाताने किंवा पायाने, वाणीने किंवा शरीराने, एखाद्या कृतीने, ऐकण्याने किंवा पाहण्याने, मनाने, जाणून किंवा अजाणता, माझ्याकडून अपराध घडले असतील तर त्या सर्वांची मला क्षमा कर. हे महादेवा, तुझा जयजयकार असो ॥५॥

इति श्रीशंकराचार्यविरचिता श्रीशिवमानसपूजा समाप्त । श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु । हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

वृत्त-मालिनी

व्याचया- ननमयययुतेयं मालिनी भोगिलोकैः।

यति - ८-७, समवृत्त-प्रत्येक पादात १५ अक्षेर व गण न न म य य

इति शम्।

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

अशी हजारो वचने पुराणात आहेत. युधिष्ठिराने पितामह भीष्मांना ''आपल्या मते सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म कोणता?'' असा प्रश्न विचारला. त्याच्या उत्तरादाखल भीष्मांनी ''एषं मे सर्व धर्माणां धर्मोऽधिकतमो मतः। यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा'' म्हणजे भगवंताचे सदासर्वकाळ नामस्मरण व स्तवन हाच सर्व धर्मांत परमश्रेष्ठ धर्म व हेच माझे निश्चित मत असे सांगितले आहे. ''सकळ धर्माचे कारण। नामस्मरण हरिकीर्तन। दया क्षमा समाधान। संतजन साधिती॥ निजधर्म हा चोखडा। नाम उच्चार धडधडा। भुक्तिमुक्तीचा सवंगडा। हा भवसिंधुतारक'' असे ज्ञानेश्वर माउली पण सांगते. समर्थ रामदासही ''नाम सारांचेही सार। नाम सकळांसी आधार। दास म्हणे सांगो किती। नामावीण नाही गती॥'' असे उपदेशतात. नामस्मरणाने पापकर्म करण्याची वृत्ती नष्ट होते. मनचंचलता हा दोषही जातो. नामाच्या वाढत्या प्रेमाने मन / चित्त भगवंताशी एकाग्र होते व साधक भगवत्रूप होतो.

सतत नामस्मरणाने गंगा आदी नद्यांचे नुसते पावित्र्यच अंगी येत नाही तर श्रद्धा, विश्वास, प्रेम या सद्गुणांचाही आपोआप उद्भव होतो. नाम हे सगुण-निर्गुण रूपांहूनही श्रेष्ठ आहे ते यामुळेच. नामाला कसलेच बंधन नाही. सकल बंधनातीत असे हे नामस्मरण आहे.

''न देशकालनियमः शौच्याशौचानिर्णयः परं संकीर्तनादेव रामेति मुच्यते'' असे हे नामस्मरण महान आहे व सर्व जनांसाठी भगवत्प्राप्तीचे एक उत्तम साधन आहे .

संत एकनाथ महाराजही नाममाहात्म्याबद्दल सांगतात -

''ही अवतारचरित्रे वर्णिता। चोरटा वाल्मिकी झाला तत्त्वता। व्यास जारपुत्र सर्वथा। केला सरता तिन्ही लोकी॥'' नामाचा महिमा एवढा महान आहे हे वाल्या व व्यास यांच्या चरित्रांवरून स्पष्ट होते.

संत नामदेव आपल्या अभंगात म्हणतात

''काळवेळ नसे नामसंकीर्तनी।<br>
उच्च नीच योनी हे ही नसे।<br>
धरा नाम कंठी सदा सर्वकाळ।<br>
मग तो गोपाळ सांभाळील।<br>
कृपाळु कोंवसा सुखाचा सागर।<br>
करील उद्धार भाविकांसी।<br>
नामा म्हणे फार सोपे हे साधन।<br>
वाचे नाम घेणे इतुकेचि॥''

संत तुकारामांचा पण या संदर्भात सुंदर अभंग आहे तो असा -

''नामसंकीर्तन साधन पै सोपे।<br>
जळतील पापे जन्मांतरीची।<br>
न लागे सायास जावे वनांतरा।<br>
सुखे येतो घरा नारायण।<br>
ठायीच बैसोनि करा एकचित्त।<br>
आवडी अनंत आळवावा।

रामकृष्णहरि विठ्ठल केशवा।
मंत्र हा जपावा सर्वकाळ।
आणिक याविण नाही पै साधन।
वाहातसे आण विठोबाची।
तुका म्हणे आहे सोपे सर्वाहून।
शहाणा तो धणी घेतो तेथे॥''

श्रीसाईबाबांच्या ''श्रीसाईसच्चरितातही'' अध्याय २७ मध्ये याविषयी म्हटले आहे ते येणेप्रमाणे :

''नाम पापाचे पर्वत फोडी।
नाम देहाचे बंधन तोडी।
नाम दुर्वासनेच्या कोडी।
समूळ दवडी लोटूनि॥८५॥
नाम काळाची मान मोडी।
चुकवी जन्ममरण ओढी।
ऐसिया सहस्रनामाची जोडी।
शाम्यास गोडी लागावी॥८६॥
नाम प्रयत्ने घेता चोखट।
अप्रयत्नेही नाही ओखट।
मुखासी आले जरी अवचट।
प्रभाव प्रकट करील॥८७॥
नामापरीस सोपे आन।
अंतःशुद्धीस नाही साधन।
नाम जिव्हेचे भूषण।
नाम पोषण परमार्था॥८८॥
नाम घ्यावया नलगे स्नान।
नामासि नाही विधिविधान।
नामे सकळपापनिर्दाळण।
नाम पावन सर्वदा॥८९॥''

यांत ''श्याम'' हा जो शब्द ओवी ८६ मध्ये आला आहे तो साईबाबांचा लाडका भक्त श्याम्या. त्याची इच्छा नसतानाही बाबांनी श्रीविष्णुसहस्रनामाची पोथी त्याच्या गळ्यात बांधली होती. तसेच स्वतःचे नाम घेण्याबद्दल श्रीसाईबाबा म्हणले ते असे : अध्याय ३ रा, अ. १० व अ. १३ व्यातील या ३ ओव्या

वरी एक सांगतो शामा।
प्रेमे घेईल जो मन्नामा।
तयाच्या मी सकळ कामा।
पुरवी प्रेमा वाढवी॥११॥ अ. ३
सोडूनिया लाख चतुराई।
स्मरा निरंतर ''साई साई''।
''बेडा पार'' होईल पाही।
संदेह कांही न धरावा॥१३५॥ अ. १०
''साई साई'' नित्य म्हणाल।
सात समुद्र करीन न्याहाल।
या बोला विश्वास ठेवाल।
पावाल कल्याण निश्चये॥१२॥ अ.१३

अक्कलकोटच्या स्वामी समर्थांनीही त्यांच्या परमप्रिय शिष्य बाळप्पास ''श्रीस्वामीसमर्थ'' नामजप करण्यास सांगितले होते. स्वतः स्वामी समर्थही ''शिवहर शंकर नमामि शंकर शिवशंकर शंभो। हे गिरिजापति भवानिशंकर शिवशंकर शंभो॥'' असे शिवनाम घेत असत. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज आणि संत रामदास रामभक्त व नामयोगी. गोंदवलेकर महाराज तर केवळ श्रीरामाचेच नाम घेणारे नामयोगी. या सर्वांनी जनतेस नाममाहात्म्य सांगितले व नामस्मरण मार्गी लावले. नाम शाश्वत आहे. रामकृष्ण आले व गेले, पण नामरूपाने अक्षय राहिले, तेव्हा नाम अक्षय आहे. नाममहिमा अगाध आहे व नामाच्या फलप्राप्तीस सीमाच नाही.

नाम हे परमेश्वराचे अनाहत नादरूप ॐ, त्याचेच नादरूप स्वरूप म्हणजे ''नामसंकीर्तन'' हे यावरून स्पष्ट होईल. ''घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे ॥'' हा संत तुकारामांचा अभंग, ''अमृताहुनी गोड नाम तुझे देवा'' हा नामदेवांचा अभंग इ. अनेक संतांच्या रचना या संदर्भात आहेत. लेखविस्तारभयास्तव त्या सर्व येथे घेता येत नाहीत. क्षमस्व! या लेखाचा उद्देश वाचकांना हा नामस्मरणमहिमा विशद करणे एवढाच होता. संत एकनाथ म्हणूनच सांगून गेले की :-

''सगुण चरित्रे परमपवित्रे आधी वर्णावी।
सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी ॥''

स्वतः पांडुरंगांनी ''विठ्ठलहृदय'' स्तोत्रात स्पष्ट सांगितले आहे की,

''ॐ कारो ऽ नाहतो मूर्तिराहतो नामसंकीर्तनम्।'' म्हणजे मी ॐकारात नाही, मूर्तीत नाही, मी नामसंकीर्तनात आहे. यापेक्षा आणखी काय हवे नामस्मरणमहिमा वर्णण्यास?

कलियुगात नामस्मरण हेच साधन सर्वांसाठी आहे. हल्ली ATM मशीन्स म्हणजे ANY TIME MONEY सर्वत्र आली आहेत. पैशाची नड असते तेव्हा आपण या मशीनमध्ये आपले ATM CARD घालून ती भागवतो. पण परमार्थात आपण आपल्या अंतर्यामी ATN खात्याचे मशीन स्थापन करावे. ATN म्हणजे ANY TIME NAM. यात जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तेव्हा ''भावभक्तिश्रद्धानिष्ठ'' युक्त कार्ड घालून नामस्मरण जमा करावे. या मशीनमध्ये फक्त जमाच होते. हिशेब ठेवण्याचे काम भगवंताचे आहे व कोणते फळ कधी, कसे द्यावयाचे इ.इ. सर्व परमेश्वरच करील. अपेक्षा / सकाम भक्ती करू नका. तुमचा दृढतम विश्वास व श्रद्धा तुम्हांस तुमच्या उद्धारासाठी उपयुक्त ठरेल. स्वतः नामस्मरण करावे. ''जो स्वयेचि कष्टत गेला तोचि भला'' हे संत रामदासांनी सांगितले आहे ते लक्षात ठेवा.

माळा, आसन इ.इ. प्रकार नामस्मरणात गौण आहेत. तांत्रिक बाबींत गुंतू नये. श्रद्धा + भक्ती + अनन्यसमर्पण +निष्कामता +भगवत्प्रेम यांनी युक्त नामस्मरण हेच खरे मोक्षसाधन.

या लेखाचा उद्देश केवळ नामस्मरणाचे / नाममाहात्म्याचे क्षितिज किती प्रचंड, विस्तृत आहे, ह्याची कल्पना देण्याचाच आहे. वाचकांनी स्वतः याबाबत अधिक माहिती मिळवावी व सुयोग्य प्रकारे नामस्मरणाची कास धरून स्वतःचा उद्धार करून घ्यावा ही विनंती. ''अधिक ते सरते, न्यून ते पुरते'' या लेखात करून घ्यावे. इत्यलम्.

**वसंत गोडबोले**
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

**१ एप्रिल २०१५ पासून टपाल खात्याने मनिऑर्डर सेवा बंद केली आहे. याची देणगीदारांनी नोंद घ्यावी.**

अखेर कंसाचा निर्णय पक्का झाला. कृष्णाला आणि बलरामाला सरळ मथुरेतच बोलवावं आणि करावा त्यांचा निःपात! एकदा का ते आपल्या साम्राज्यात आले की काय बिशाद ते जिवंत सुटतील! कंसानं मग अनेक प्रकारे त्यांचा वध करण्याच्या योजना आखायला सुरुवात केली.

आपल्या पदरच्या मुष्टिक, चाणूर या मल्लांना त्यानं रामकृष्णांना मल्लयुद्धाचं आव्हान देऊन ठार मारण्याची आज्ञा केली. त्यानं कुवलयपीड नावाच्या मदोन्मत्त गजाची रामकृष्णांना चिरडून मारण्यासाठी योजना केली. ते दोघे भाऊ विनासायास मथुरेला यावेत म्हणून त्यानं धनुर्याग आयोजित करून देशोदेशीच्या प्रतिष्ठितांनापण त्याचं निमंत्रण दिलं आणि वसुदेवाचा परममित्र अक्रूर याची रामकृष्णांना घेऊन येण्यासाठी वृंदावनी रवानगी केली.

अक्रूरानं वृंदावनप्रवेशानंतर आपल्या येण्याचा हेतू स्पष्ट केला. त्याआधी त्यानं नंदादी गोपश्रेष्ठांना कृष्णजन्माची सारी कथा निवेदन केली. या त्याच्या वक्तव्यांनी अखंड वृंदावनावर दुहेरी वज्राघात झाला. एक तर कृष्ण आपला कोणीच नव्हे, तो गोपकुळातला नसून राजकुळातला आहे आणि दुसरं म्हणजे दुसऱ्याच दिवशी तो बलरामासह आपल्याला अगदी एकटं सोडून, कदाचित कायमचाच निघून जाणार आहे या कल्पनेनं अवघ्या गोपकुळाच्या शोकाला सीमा राहिल्या नाहीत.

रामकृष्णांनी त्यांची सर्वतोपरी समजूत घालून पाहिली, पण कोणत्याच प्रकारे त्यांची समजूत पटेना. सारे वृंदावनवासी त्या सच्छील अक्रूराला बोल लावू लागले, दूषणं देऊ लागले. माता यशोदेची अवस्था अत्यंत करुण झाली. हे वृत्त ऐकण्याआधी जगन्नियंत्यानं आपले पंचप्राण का हरण केले नाहीत? भूमातेनं दुभंगून आपल्याला स्वतःच्या उदरात स्थान का दिलं नाही असं ती वारंवार सर्व उपस्थितांना विचारू लागली. तिला द्यायला समाधानकारक असं उत्तर कोणापाशीच नव्हतं!

नंदानं मात्र आपलं मन घट्ट केलं. प्रसंग काय आहे हे जाणून सर्वांनाच समयोचित वर्तन करण्याची विनंती केली. अक्रूराचं योग्य आदरातिथ्य करून रात्री चांगली विश्रांती घेण्याविषयी सुचवलं की जेणेकरून दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रवास करताना अक्रूर ताजातवाना राहील.

त्या रात्री वृंदावनात ना कोणी जेवलं ना कोणी झोपलं. खुद्द कृष्ण सुहृदांसवे घरोघरी हिंडून सर्वांची समजूत घालत होता, त्यांचे आशीर्वाद मागत होता, निरोप घेताना पुनर्भेटीचं आश्वासन देत होता. पहाटेच्या सुमारास तो आपल्या वाड्यात परत आला. येताक्षणी तो जो यशोदेच्या कुशीत शिरला तो किती कालपर्यंत बाहेरच आला नाही.

अखेर निरोपाचा दुर्धर क्षण आला. रामकृष्ण आणि नंदाला घेऊन अक्रूराचा रथ पुढे चालतो आहे आणि त्यामागून कंसासाठी नंदानं घेतलेले नजराणे, दूधदुभत्याचे खाद्यपदार्थ घेतलेल्या बैलगाड्या संथगतीनं वृंदावन सोडून जात आहेत हे दृश्य अपरोक्ष पाहताच आबालवृद्ध

वृंदावनवासीयांचे सारे बांध फुटले आणि ते कृष्णाला अत्यंत हृदयद्रावक असा आक्रोश करून विचारू लागले...

**'निरोप' - जाती वंशमणी**

साश्रू नयने पुसती ते व्रजवासी
का आज अम्हा सोडुन मथुरे जासी ॥धृ॥

हे गोपाला काय योग हा आला
वृंदावनिचा सूर्य अस्त की झाला
हे प्राणसख्या का विसरी प्रेमाला
करुन वियोगी दग्ध परीक्षा घेसी ॥१॥

नृप मातुल तो संतसज्जना नाडी
मारण्या तुला उघडली असे आघाडी
कपटा करुनी तुजला घेण्या धाडी
सुशील सज्जन भोळ्या अक्रूरासी ॥२॥

तू जरि असशी कुमार राजकुळीचा
अमुच्यासाठी सखाच गोपकुळीचा
का आज असा होत कठोर मनाचा
करण्या निघसी अपुल्या कर्तव्यासी ॥३॥

का नियति करी अमुची चेष्टा क्रूर
जणु श्वास निघे काये सोडुनि दूर
बंध त्यजोनी यमुने येई पूर
ना कळे कसे टाळावे लिखितासी ॥४॥

आता आम्ही गूज कुणा सांगावे
कुणासवे ते खेळ वनी खेळावे
साद घालता का गाईंनी यावे
वृक्ष एकले स्मरती रासलीलांसी ॥५॥

तुजवीण कुठे संकटकाळी जाऊ
रोचक गीते कोणासंगे गाऊ
परतोनि कसे आनंदाने न्हाऊ
आता रिझवी सांग कोण आम्हासी ॥६॥

यशोमतीने का तुजवीण रहावे
तव मुखकमला कैसे तिने पहावे
गाली कोणा काजळास लावावे
नच साहु शके माता तव विरहासी ॥७॥

अजि आण अम्ही जगदीशाची घेतो
तुझियासंगे मथुरेमाजी येतो
जरी नृप बळे येउ अम्हास न दे तो
झडकरिच त्यागु आम्ही निज प्राणांसी ॥८॥

वृंदावनवासीयांचा जड मनाने निरोप घेऊन सारे मथुरेत दाखल झाले. अक्रूराला आपल्या आगमनाची वार्ता कंसाला कळवण्यासाठी पुढे धाडून रामकृष्ण नंदासह यमुनेच्या वाळवंटात भोजन आणि विश्रांतीसाठी थांबले. त्यानंतर सारे मथुरेची शोभा पाहायला नगरीतून फेरफटका मारू लागले.

कंसाच्या आज्ञेवरून नागरिकांनी मथुरा सुशोभित केली होती. प्रत्येक घराला तोरणं लावली होती. रांगोळ्या काढल्या होत्या. कृष्णाच्या आगमनाच्या वार्तेनं त्यांची उत्सुकता पालवली गेली होती. रामकृष्ण मथुरेत फिरताना अतिशय कुतूहलानं ते त्या पराक्रमी जोडगोळीकडे बघत होते, तर्ककुतर्क करत होते.

वाटेत अनेक श्रद्धाळू नागरिकांनी त्यांना पुष्पहारादी भेटवस्तू अर्पण केल्या. रामकृष्णांनी सस्मित वदनानं त्यांचा स्वीकार केला. एका धोब्यापाशी त्यांनी कंसभेटीच्या वेळी परिधान करायला शुभ्र वस्त्रं मागितली. त्या वेळी त्या मूर्खानं रामकृष्णांना अनेक प्रकारची दुरुत्तरं करण्यास प्रारंभ केला. मग कृष्णानं त्याचा एकाच थपडीत निकाल लावला.

त्यानंतर ते सर्व धनुर्यागाच्या मंडपाशी जाऊन पोहोचले. तिथे एका चौथऱ्यावर एक

महाप्रचंड धनुष्य ठेवलं होतं. कंसाच्या रक्षकांच्या विरोधाला न जुमानता कृष्णानं ते धनुष्य एका हातानं सहजच उभं केलं आणि दुसऱ्या हातानं तो त्याला प्रत्यंचा लावायचा प्रयत्न करू लागला. तत्क्षणी कडाड् असा आवाज होऊन त्या धनुष्याचे दोन तुकडे झाले. ते पाहताच धनुष्याचे रक्षक कृष्णावर धावून आले. परंतु हातातल्या तुकड्यांनीच कृष्णानं त्यांचा लीलया वध केला.

या सर्व बातम्या कंसाच्या कानावर पडताच तो अतिशय चिंतित झाला, भयभीत झाला. त्याला कोणाचाच आणि कशाचाच भरवसा वाटेनासा झाला. दुसऱ्या दिवशीच्या काळजीनं त्याचं हृदय विदीर्ण झालं. तो वारंवार आपल्या सहकाऱ्यांना दक्षतेच्या सूचना देऊ लागला, त्यांच्या अंगावर विनाकारण खेकसू लागला. त्या रात्री अर्थातच निद्रादेवी कंसमहालाच्या आसपासही फिरकली नाही.

आणि मग मुख्य समारंभाचा दिवस उजाडला...

**'कंसवध' - वृत्त तोटक**

फिरता नगरी बलराम हरी
जन हर्षित आस नवीन उरी
मथुरानृप कंस भये बिथरे
वधण्या अधमा हरि ये मथुरे ॥१॥

गज मत्त असे पिउनीच सुरा
नृप मारविण्या जमवी असुरां
तरिही नच मानसि धैर्य उरे
खल संहरण्या हरि ये मथुरे ॥२ ॥

नमुनी वडिलां द्वय बंधु झणी
निघती हनण्या निज शत्रु रणी
यश चिंतति त्या जन प्रेमभरे
सुटका करण्या हरि ये मथुरे ॥३ ॥

भयभीत अती जरि कंस मनी
गजराज समोर तया करुनी
वसुदेवसुतांसि करी समरे
जन सोडवण्या हरि ये मथुरे ॥४॥

मदमस्त गजा हरि पाहतसे
उपटूनि सुळा तव मारतसे
बलवान हरी गजश्रेष्ठ मरे
जन सावरण्या हरि ये मथुरे ॥५॥

मग मुष्टिक चाणुर ये पुढती
पण होत तयांसहि तीच गती
उरले सुरले अवसान सरे
जन चेतवण्या हरि ये मथुरे ॥६॥

यमदूत दिसे अन् कंस पळे
तंव कृष्ण तया पकडोनि बळे
धरणीवर पाडतसे निकरे
जन आश्वसण्या हरि ये मथुरे ॥७॥

वळुनी निज मुष्टि अती गहिरे
हरि वार करी दुसरे तिसरे
बळ ते मथुराधिपती न पुरे
जन वाचवण्या हरि ये मथुरे ॥८॥

रुधिरास मुखे अपुल्या वमला
मथुरानृप नीजजिवा त्यजला
जयती हरिला जन हर्षभरे
जन तोषवण्या हरि ये मथुरे ॥९॥

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

**भगवंताचे अभय**

फाल्गुनमास सुरू होण्याला आता तीन-चार दिवस उरले होते. पृश्नीने यज्ञशाला, पर्णकुटी आणि अंगण सारवून घेतले आणि पतीने सांगितल्याप्रमाणे तिने पयोव्रताची तयारी केली.

यज्ञशालेत एक चांगला चौरंग ठेवून तेथे पूजा करण्याचे तिने ठरविले.

मग प्रतिपदेच्या दिवशी पहाटेस उठून तिने आपले गृहकृत्य आटोपले आणि स्नानासाठी नदीवर जाण्याला ती आश्रमातून बाहेर पडली.

वाटेत शेतांतून जाताना तिला एके ठिकाणी रानडुकराने उकरलेली माती दिसली. स्नानाच्या वेळी अंगाला लावण्यास ती चांगली म्हणून पृश्नीने त्या मातीची दोन-तीन लहान ढिपळे उचलून हाती घेतली.

नदीवर तिने वस्त्रे धुतली आणि स्नानासाठी ती पाण्यात उभी राहिली.

बरोबर आणलेली माती सर्वांगाला लावताना, दैत्यांनी पृथ्वीला रसातळाला नेले असता भगवंताने एका डुकराचेच रूप घेऊन तिला वर काढले, त्या कथेची पृश्नीला आठवण झाली आणि 'भगवंता, तुझी लीला अगम्य आहे' असे म्हणून तिने भगवंताला वंदन केले.

मग सर्वांगाला माती चोळून तिने स्वच्छ स्नान केले, वस्त्रे बदलून धुतलेल्या वस्त्रांचे पिळे खांद्यावर टाकले आणि कंबरेवर नदीच्या पाण्याची कळशी घेऊन ती आश्रमात परत आली.

वाटेत जेथे तिला रानडुकराने उकरलेली माती आढळली होती त्या जागी वराहनारायणाला अर्घ्य म्हणून कळशीतील थोडे पाणी ओतायला ती विसरली नाही.

आश्रमात परत आल्यावर पृश्नीने आपले नित्यनैमित्तिक उरकले. यज्ञकुंडातील अग्नी नीट करून त्याला आहुती दिली आणि मग स्वस्थ चित्ताने ती भगवंताच्या पूजेच्या तयारीला लागली.

प्रथम तिने पर्णकुटीतील आपली रोजच्या पूजेची श्रीविष्णूची मूर्ती ताम्हनात घालून यज्ञशाळेत आणली व चौरंगापुढे पाट ठेवून, तिने ती मूर्ती ताम्हनासकट त्यावर ठेविली.

मग दर्भासन मांडून ती त्यावर पूर्वेकडे तोंड करून पूजेला बसली. त्या वेळी पृश्नीची मुद्रा प्रसन्न दिसत होती.

तिने प्रथम त्या मूर्तीला पंचामृताचे स्नान घातले, दुधाचा अभिषेक केला आणि मग नीट पुसून तिने ती ताम्हनात ठेवली. मग गंध, पत्र, पुष्प, अक्षता, धूप, दीप, नैवेद्य वगैरेंनी तिने भगवंताची षोडशोपचार पूजा केली.

पूजा चालू असता पृश्नीचे सारे चित्त भगवंताच्या मूर्तीवर एकाग्र झाले होते. तोंडाने 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' हा मंत्र ती एकसारखा म्हणत होती.

पूजा आटोपल्यावर पृश्नीने आज मुद्दाम तयार केलेल्या पायसाचा नैवेद्य भगवंताला अर्पण केला.

पूजेसाठी अनेक अतिथी आश्रमात आले होते. त्यांना तिने तो पायस मग प्रसाद म्हणून दिला.स्वतः आपण मात्र त्या दिवशी नुसत्या दुधावर राहिली.

सायंकाळी पृश्नीच्या आश्रमात अनेक ऋषिस्त्रिया जमा झाल्या. त्यांपैकी एकीने भगवान विष्णूच्या लीला वर्णन करणाऱ्या कथा सांगितल्या आणि मग सर्वांनी मिळून भगवंताची स्तुतिस्तोत्रे म्हटली.

त्या घरोघरी निघून गेल्यानंतर बरीच रात्र होईपर्यंत पृश्नीने भगवंताच्या मूर्तीसमोर बसून 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' ह्या मंत्राचा जप केला.

अशा प्रकारे नुसत्या दुधावर राहून, सकाळी भगवंताच्या मूर्तीची पूजाअर्चा, सायंकाळी कथाश्रवण व गुणगायन आणि रात्री 'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' ह्या मंत्राचा जप करीत पृश्नीने हे पयोव्रत सतत बारा दिवस एकनिष्ठपणे चालू ठेवले.

तेराव्या दिवशी त्या व्रताचे यथासांग उद्यापन करून पृश्नीने अतिथिअभ्यागतांना आणि गोरगरिबांना मिष्टान्नाचे जेवण घातले व मग स्वतः भोजन करून आपला बारा दिवसांचा उपवास पतीचे ध्यान करीत तिने स्वस्थ चित्ताने सोडला.

त्या दिवशी पृश्नीला एक आगळीच प्रसन्नता वाटत होती. रात्री नित्याप्रमाणे भगवान विष्णूच्या मूर्तीसमोर बसून ती बराच वेळपर्यंत एकाग्र चित्ताने त्याचे ध्यान करीत असता, शंख, चक्र, गदा, पद्म हाती असलेला सुहास्यवदन भगवान विष्णू पृश्नीला आपल्यासमोर प्रत्यक्षपणे प्रकट झालेला दिसला. भगवंताची ती नयनमनोहर मूर्ती डोळ्यांसमोर दिसताच पृश्नीला गहिवरून आले आणि लगेच उभे राहून तिने भगवंताला अत्यंत आदराने नमस्कार केला.

तिच्या डोळ्यांवाटे आनंदाश्रू वाहत होते आणि सर्वांगावर रोमांच उभे राहून, तिच्या शरीराला कंप सुटला होता. कंठ सद्गदित झाल्याकारणाने तिच्या तोंडून शब्दही बाहेर पडेना.

काही क्षण ती तशीच भगवंताकडे टक लावून पाहत उभी राहिली. जणू आपल्या अधाशी नेत्रांनी ती भगवंताला गटागट पिऊनच टाकीत होती !

हळूहळू पृश्नीचे चित्त शांत झाले. ती मंद मंद स्वराने बोलू लागली, ''भगवंता, माझी सेवा गोड मानून घेतलीस, मला दर्शन दिलंस, तू दीनांचा दयाळ आहेस असं म्हणतात ते खरं झालं.''

पृश्नीची ती भांबावलेली स्थिती पाहून भगवंताला तिच्याबद्दल अनुकंपा वाटली व तो तिला म्हणाला, ''पृश्नी, तुझी अनन्य निष्ठा पाहून मी संतुष्ट झालो आहे. सांग, तुझी काय इच्छा आहे?''

भगवंताचे मधुर भाषण ऐकून पृश्नीला आनंद झाला. ती त्याला म्हणाली, ''भगवंता, तू तर सर्वज्ञच आहेस. बलिराजाच्या प्रोत्साहनामुळे प्रजा विषयलंपट झाल्याकारणाने वेदांची आबाळ झाली आहे. त्यामुळे अस्वस्थ होऊन माझे पती तपश्चर्येला गेले आहेत, हे तू जाणतोसच. त्यांच्या चित्ताला शांती लाभावी ह्याहून माझी दुसरी कोणती इच्छा असणार?''

भगवान म्हणाला, ''मुली, पतिव्रतेला साजेसंच तुझं हे भाषण आहे. पतीच्या सुखाखेरीज

दुसरा कोणताही विचार मनाला न शिवणारी तुझ्यासारखी भार्या असणारा काश्यप धन्यच म्हटला पाहिजे. पृश्नी, चिंता करू नकोस. तुझ्या पतीच्या अस्वस्थतेचं मी लवकरच निराकरण करीन.''

असे म्हणून भगवान विष्णू तेथल्या तेथेच गुप्त झाला. भगवंताचे अभय मिळाल्यामुळे पृश्नीला त्या रात्री अत्यंत गाढ झोप लागली.

**आंधळे जग**

काश्यपऋषी आश्रमाच्या बाहेर पडला तो नर्मदेच्या किनाऱ्याकिनाऱ्याने अमरकंटक पर्वताकडे जाऊ लागला.

त्याचा मार्ग दाट जंगलांतून होता. जलकदंब, शाल, अशोक, तिवस, करंज, टेंभुरणी इत्यादी शेकडो वृक्षांच्या छायेतून तो जात होता.

प्रफुल्लित लतांनी वेष्टिलेले ते उंच उंच वृक्ष फुलाफळांनी बहरलेले होते. त्यांची परिपक्व फळे वाऱ्याचा धक्का लागताक्षणीच टपटप खाली पडत होती. सारे रान मधुर सुवासाने दरवळले होते.

नानाविध पक्षिगण त्या झाडांवर बसून मधुर कूजन करीत होते. वानरांची टोळकी पिलांना पोटाशी धरून ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत होती. काही वानर झाडांच्या फांद्यांवरून लोंबकळत होते, तर काही त्याच्या वाटेवर बसून, नाक खाजवीत, त्याच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहत होते.

हत्तींनी सोंडेने मुरगळलेले मोठमोठाले वृक्ष मार्गावर पडलेले त्याला दिसले.काही जागी नदीकडे पाण्यासाठी धावत जात असलेले हरिणांचे कळप त्याने पाहिले. कोल्हे, तरस, अस्वल, रानडुक्कर, वनगायी वगैरे श्वापदे काश्यपाची चाहूल लागताच मधूनमधून पळत होती आणि दुरून वाघांसारख्या हिंस्र पशूंच्या डरकाळ्या ऐकू येत होत्या.

ग्रीष्म ऋतू असल्यामुळे सूर्य अत्यंत प्रखरतेने तळपत होता. पण झाडी इतकी गर्द होती की काश्यपाला उन्हाची झळ मुळीही जाणवत नव्हती.

नर्मदाकाठचा तो प्रवास अत्यंत रोमांचकारी होता. मंदमंद वाहणाऱ्या सुगंधयुक्त वायूच्या लहरींमुळे काश्यपाचे चित्त शांत झाले होते. त्याला स्वतःचा विसर पडला होता.

अशा प्रकारे तीन-चार दिवस प्रवास झाल्यानंतर त्याला धबधब असा दूर अंतरावर होत असलेला आवाज ऐकू येऊ लागला. नदीकाठची झाडी अधिकाधिक गर्द होत चालली. नदीच्या पाण्याचा जोरही वाढू लागला.

औत्सुक्याने तो पुढे पुढे जात होता. नकळत त्याची पावले झपाझप पडत होती. आता पाणी दुधासारखे शुभ्र दिसू लागले. त्याची खळखळ वाढली आणि धबधब होणारा आवाजही मोठा होत गेला.

थोडे पुढे गेल्यावर त्याच्या डोळ्यांना जे दृश्य दिसले ते पाहून तर तो विस्मयाने थक्कच झाला.

समोरच्या बाजूला पाच पुरुष उंचीचा एक भला मोठा उंचच उंच कडा उभा होता. त्यावरून दुधाच्या फेसाप्रमाणे शुभ्र दिसणारे नदीचे पाणी असंख्य धारांनी धबधब आवाज करीत जोराने खालील कातळावर आदळत होते.

तो अवाढव्य सलंग कडा, त्याच्या सभोवतालचे खडक आणि खालचा कातळ हे सारेच विविध रंगाच्या संगमरवरी दगडांचे होते.

सूर्यप्रकाशात ते सारे दगड चकाकत होते.

काचेच्या लोलकातून सूर्याकडे पाहिले असता एकमेकांत संमिश्रित असे इंद्रधनुष्याचे सारे रंग जसे त्यात दिसतात, त्याप्रमाणे नाना रंगांच्या छटा कड्यावरून खाली पडत असलेल्या त्या पाण्यात दिसत होत्या.

विविध रंगांच्या त्या छटा पाहून जणू रंगीबेरंगी वस्त्रे परिधान केलेल्या अप्सराच नदीच्या त्या पांढऱ्याशुभ्र पाण्यावर स्वैरपणाने क्रीडा करीत आहेत असे भासत होते.

आजूबाजूस नदीकाठच्या झाडांवर बगळ्यांचे थवेच्या थवे बसले होते. नदीच्या पाण्यावरील आपले स्थान अप्सरांनी पटकाविल्याबद्दल त्यांच्याकडे मत्सराने पाहत, किलकिल करून, त्या बकांनी एकच गोंधळ माजविला होता.

दुग्धधारांचे ते सुंदर दृश्य पाहून काश्यपाचे हृदय उचंबळून आले.

सूर्य माध्यन्हीला आला होता. संध्यावंदन आटोपून तो प्रसन्न चित्ताने त्या तीर्थाच्या पायथ्यापाशी उंचवट्यावर एका झाडाखाली बसला.

इतक्यात तीस-चाळीस तरुणतरुणींचा एक घोळका मोठमोठ्याने हसत खिदळत त्या ठिकाणी येऊन पोचला. त्यातील तरुणांनी गडद रंगाचे तंग पोशाख चढविले होते. तरुणींनी चित्रविचित्र आकृत्या असलेली नाना रंगी झिरझिरीत वस्त्रे परिधान केली होती. त्यांचे पदर वाऱ्यावर उडत होते.

धवल, आरक्त, कृष्ण इत्यादी अनेकरंगी सौंदर्यप्रसाधनांनी या तरुणींनी आपले देह नाना प्रकारे सजविले होते.

त्यांच्या विविध प्रकारच्या केशरचनांकडे पाहिले असता त्या करण्यात त्यांचा केवढा काळ आणि कल्पकता खर्ची पडली असेल ह्याची कल्पनाही करणे कठीण होते.

काहींनी आपले केस कपर्दिन म्हणजे शंकराच्या जटांप्रमाणे डोक्यावर घेऊन बांधले होते, तर काहींनी ते मानेवर डाव्या अथवा उजव्या बाजूला फुगवून त्यांना गाठी मारल्या होत्या. कोणी ते चक्रव्यूहासारखे रचून डोकीच्या पाठीमागे मधोमध बसविले होते, तर कोणी त्यांच्या शेपट्या बनवून त्या पाठीवर सोडल्या होत्या.

एक-दोघींनी तर ते सर्वस्वी मोकळेच सोडले होते. जणू कोणत्याही प्रकारच्या बंधनात राहण्याची त्यांची इच्छा नव्हती!

ही तरुण मंडळी दुग्धधारा तीर्थापासून पाच-सहा योजने अंतरावर असलेल्या जाबालीनगर नावाच्या शहरातून आज येथे विहारासाठी आलेली होती.

ते नगर बलिराजाने जाबाली नावाच्या आपल्या पित्याच्या गुरूच्या स्मारकार्थ मुद्दाम बसविले होते.

जाबाली पक्का जडवादी होता. त्याच्या मते देह हा पंचमहाभूतांपासून निर्माण होतो आणि मृत्यूनंतर तो पुन्हा त्यांतच विलीन पावतो. चैतन्य त्याला आपोआपच प्राप्त होते.

खरा म्हणजे देहच. तो आहे म्हणूनच आपण आहोत. देह गेल्यावर काय उरते? काहीच नाही.

म्हणून मग देह आहे तोपर्यंत त्याला सर्व

प्रकारची सुखोपभोगाची साधने प्राप्त करून द्या, त्याचे पुजारी बना, त्याला पूर्णतया तोषवा, त्यातच खरा पुरुषार्थ आहे, असे तो निष्ठेने प्रतिपादन करी.

खा, प्या, नटा आणि मन मानेल तसे वागून मौज करा अशी त्या जाबालीची शिकवण असे.

त्या शिकवणीत तयार झालेली जाबालीनगरातील ही तरुण मंडळी आज येथे ह्या निर्जन स्थळी मुद्दाम विहारासाठी म्हणून आली असता त्यांच्या चेष्टांना ऊत आला तर त्यात आश्चर्य नाही.

संगमरवरी खडकांवरून खाली पडत असलेल्या दुग्धधारांचे दृश्य दृष्टीस पडताच तो तरुणतरुणींचा घोळका आनंदाने बेहोश झाला आणि ''काय रे ही मजा'', ''काय ग हे सौंदर्य'' असे मोठमोठ्याने म्हणत चारी दिशांना पांगला.

मग काणी जनावरांसारखे आवाज काढून ओरडू लागले, कोणी ताल धरून टाळ्या पिटू लागले, तर कोणी डोंगराकडे तोंड वळवून आपला प्रतिध्वनी ऐकण्यास मिळावा म्हणून आपल्या साथीदारांची नावे अचकटविचकट प्रकारे घेऊन त्यांना हाका मारू लागले. बाकीच्यांतील काहीनी बरोबर आणलेली मृदंग, नाल, डमरू, शृंग, सुषिर, काराधुनी, झांज, वगैरे वाद्ये काढून ती वाजविण्यास प्रारंभ केला.

वाद्ये वाजू लागताच, इतस्ततः पांगलेले ते सारे तरुण आणि तरुणी, वाद्ये वाजविणारांच्या सभोवती गोळा झाले आणि गाणी म्हणत नाचू लागले.

साऱ्यांच्या तोंडाला वारुणीची घाण येत होती. त्यांच्या तोंडावाटे बाहेर पडत असलेली गाणीही बीभत्स रसाने परिपूर्ण होती. लवकरच त्यांचा ताळ सुटला.

दूर अंतरावर झाडाखाली विश्रांती घेत असलेल्या काश्यपाच्या नजरेसमोरच हा सारा प्रकार घडत होता. तो पाहून त्याला बलिराजाच्या त्या नागरिकांची घृणा आली. त्याचे मग उद्विग्न झाले.

आणखी एक क्षणही तेथे बसणे आता त्याला शक्य नव्हते. त्याने एक दीर्घ सुसकारा टाकला व तो मुकाट्याने आपल्या मार्गाला लागला.

पण त्याचे लक्ष ठिकाणावर नव्हते. पावले कशीतरी पडत होती.

नुकत्याच पाहिलेल्या त्या तरुणतरुणींच्या बेछूटपणाच्या वागण्याने त्याच्या मनाला जबरदस्त धक्का बसला होता. त्याच्या नुसत्या आठवणीनेही काश्यपाला अजून हादरल्यासारखे होत होते.

नाना प्रकारचे विचार मनात आणून त्याने ते स्थिरावण्याचा यत्न केला. पण मन न स्थिरावता, उलट त्याचा उद्वेग वाढतच गेला. तेव्हा अत्यंत तिरस्काराने तो स्वतःशीच म्हणाला, ''हं. खा, प्या, नटा आणि मौज करा! वा रे तुमचं जीवनशास्त्र!!''

काही केल्या दुग्धधरांवरील किळसवाणा प्रकार त्याच्या डोळ्यांआड होईना. त्याला त्वेष आला. त्या भरातच तो मनात म्हणाला, 'बलिराजा, तरुणांना भोगासक्त बनवून तू त्यांना कोणत्या दशेला आणून सोडलं आहेस ते पाहा.'

भावनेच्या अतिरेकापायी काश्यपाचे मुख आता म्लान झाले होते. श्रांत स्वराने तो पुढे

म्हणाला 'हर! हर! पशूंत आणि आम्हां मानवांत आता फरक तो काय राहिला? परमेश्वरा, असले प्रकार पहाण्यापेक्षा डोळे मिटलेस तरच बरं!'

काश्यपाचा जीव आता पुरता उबगला होता. मेंदूला शीण आला होता. पाय कसेतरी फरपटत होते. नाइलाजाने तो बाजूला एका झाडाखाली विश्रांतीसाठी बसला.

तेथे त्याचा डोळा लागला. बऱ्याच वेळाने फडफड असा आवाज होऊन काश्यप जागा झाला.

त्याच्यासमोरच असलेल्या झाडाच्या बुंध्याला एक लहानशी ढोली होती. डोकीवर लालभडक तुरा असलेला एक मोहक पक्षी, दोन्ही बाजूंस मान वळवून पाहत पाहत, त्या ढोलीवर येऊन बसला आणि आपली चोच ढोलीत खुपसून तिच्यातून आणलेले भक्ष्य ढोलीत असलेल्या आपल्या आंधळ्या पिलाच्या तोंडात प्रेमळपणे घालू लागला.

ते दृश्य पाहत असता काश्यपाच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले आणि 'आंधळ्या जगाला असं मायेनंच भरवलं पाहिजे' असे उद्गार सहजच त्याच्या तोंडून बाहेर पडले.

त्याच वेळीं त्याला एकाएकी पृथ्वीची आठवण होऊन अनेक सुखद स्मृती त्याच्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. त्यामुळे त्याचा सारा शीण नाहीसा होऊन तो उल्हसित वृत्तीने पुढील मार्गाला लागला व लवकरच अमरकंटक पर्वतावर जाऊन पोचला. (क्रमशः)

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून...**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

पश्यन्तु लोकाः कलिकौतुकानि ।[३०७]

हे लोकहो, कलियुगातील ह्या घटना पाहा :-

संपूर्ण सुभाषित :- सीदन्ति सन्तो विलसन्त्यसन्तः
पुत्राः म्रियन्ते जनकश्चिरायुः ।
परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यन्तु लोकाः...

साधुसंतांचा ऱ्हास होत आहे आणि दुष्टांची चलती आहे. (नरेन्द्र दाभोळकर आणि गोविंद पानसरे अशा विचारवंतांच्या हत्या होत आहेत) पुत्र मरण पावत आहेत आणि वडील दीर्घायू होत आहेत. (शोल चित्रपटातील उर्दू वाक्य - बापके कंधेपर बेटेका जनाजा. जनाजा म्हणजे तिरडी. वडिलांच्या खांद्यावर मुलाची तिरडी - कै. हंगल ह्या नटाचे वाक्य) परकीयांशी मैत्री आणि स्वजनांशी वैर . कलियुगात काय चालले आहे. पाहा.

पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति ।[३०८]

पराक्रमाशिवाय नशीब वर येणार नाही.

पहिली ओळ - यथा बीजं विना क्षेत्रमुप्तं भवति निष्फलम् ।

'दे रे हरी खाटल्यावरी' असे म्हणत बसण्याचे दिवस गेले.

पादलग्नं करस्थेन कण्टकेनैवकण्टकम् ।।[३०९]

पायात मोडलेला काटा, काट्यानेच काढावा.

पहिली ओळ - उपकारगृहीतेन शत्रुणा शत्रुमुद्धरेत्
उपकार केलेल्या शत्रूला हाताशी धरुन शत्रूचा नायनाट करावा. क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●

'चमत्काराशिवाय नमस्कार होत नाही' अशी प्रसिद्ध मराठी म्हण आहे. 'जेथ दिव्यत्वाची प्रचीति। तेथें कर माझे जुळती' या कविवर्य बा.भ. बोरकरांच्या काव्यपंक्तीचा तोच आशय आहे.

चमत्कार आणि दिव्यत्व यांच्यात अलौकिकता वा असामान्यता हा दुवा आहे. जिचा कार्यकारणभाव किंवा वास्तव रूप आपल्याच नव्हे, कुशाग्र आणि प्रतिभासंपन्न बुद्धीलासुद्धा आकलन होत नाही अशा घटनेला आपण चमत्कार म्हणत असतो.

अशा घटना आपण घडवू शकत नाही, पण त्या घडतात. घडतात त्या अर्थी त्या घडवणारा कोणीतरी असला पाहिजे. त्यांचा कार्यकारणभाव कोणालातरी माहीत असला पाहिजे. तो आपल्याला कळत नाही म्हणजे आपल्या बुद्धीच्या पलीकडे असलेला कोणीतरी आहे हे आपणांला समजते. 'यो बुद्धेः परतस्तु सः' आपल्या बुद्धीच्या आकलनशक्तीच्या पलीकडे जो कोणी आहे तोच परमेश्वर, असे गीता सांगते. तदनुसार आपण चमत्कारांच्या मागे 'ईश्वरी' (ईश्वराने घडविलेले) असे विशेषण जोडीत असतो. जे जे चमत्कार घडतात ते ते ईश्वरी चमत्कारच असतात. ईश्वराशिवाय दुसरा कोणी चमत्कार घडवू शकत नाही अशी सर्वसामान्यांची ठाम समजूत असते.

शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि नैसर्गिक (पंचमहाभौतिक, उत्पात, उल्कापात, भूकंप वगैरे) असे अनेक प्रकारचे चमत्कार घडत असतात.

असे विलक्षण चमत्कार मानवाला चकित करतात. दिङ्मूढ करतात. त्याची बुद्धिमत्ता, प्रतिभा पांगळी होते आणि मग स्वाभाविकपणे त्याचा अहंकार गळून पडतो. निसर्गाला आव्हान देण्याची प्रेरणा देणारा मेंदू हतप्रभ होतो, पराभूत होतो म्हणून त्याचे निवासस्थान असलेले मस्तक नम्र होते. निसर्गावर विजय मिळविण्याकरता फुरफुरणारे पुढे सरसावलेले हात त्यांचा मेंदू हा बालेकिल्लाच ढासळल्यामुळे शरणागत होतात, नम्र होतात, जुळतात.

काही हजार वर्षांपूर्वी जेथे समुद्र होता, तेथे जगातील सर्वोच्च शिखर धारण करणारा विशाल हिमालय निर्माण झाला. अशा प्रकारचे नैसर्गिक चमत्कार हे एका अर्थाने 'अपौरुषेय' (कोण्या पुरुषाने न निर्माण केलेले अशा अर्थाने नव्हे, तर कोण्या एका व्यक्तीच्या हिताकरता न घडलेले, न घडविलेले असतात अशा अर्थाने) असतात.

त्याप्रमाणे काही चमत्कार पौरुषेय (पुरुषाने - व्यक्तीने कलेले) असतात. त्यांत दोन प्रकार : १) व्यक्तीने केवळ स्वतःच्या हिताकरता केलेले. २) व्यक्तीने स्वतःच्या नव्हे तर सर्व लोकांच्या हिताकरता केलेले.

एखाद्या व्यक्तीच्या जीवनात चमत्कार घडतात, पण ते निसर्गतः घडले असले तर दोषास्पद नसतात. कारण ती व्यक्ती ते चमत्कार मी घडविले व असे अनेक चमत्कार मी घडवू शकतो असे मानीत नाही. अज्ञजनांना भासवीत नाही. भुलवीत नाही. असे हे चमत्कार विशिष्ट

व्यक्तीशी संबंधित असल्यामुळे त्यांना पौरुषेय म्हणता येईल.

असे विस्मयजनक अकल्पनीय चमत्कार प्राचीन पुराणग्रंथांपासून अगदी अर्वाचीन साधुसंतांच्या चरित्रग्रंथांपर्यंत विपुल प्रमाणात वर्णन केलेले आहेत. त्या वर्णनात काव्यात्मकता असते. अतिशयोक्ती असते. वर्णनीय व्यक्तीचा मोठेपणा दाखविण्याकरता प्रत्यक्षात घडलेल्या किंवा प्रायः न घडलेल्या घटनांचे काल्पनिक वर्णन केलेले असते.

पुराणांतील घटना रूपकात्क शैलीने वर्णन केलेल्या असतात. त्यांचे रूप - मूळ रूप - गूढ असते. प्रतीकात्मक असते. ते प्रतीक खोटे नसते, पण सामान्य लोकांना ते आकलन होत नाही म्हणून रहस्यात्मक भाग बाजूला राहून अतिशयोक्त भाग तेवढाच लक्षात राहतो आणि तो चमत्कार म्हणून मानला जातो. उदाहरणार्थ श्रीकृष्णाने आपल्या गुरूचा लवणासुराने पळवून नेलेला पुत्र गुरुदक्षिणाा म्हणून सोडवून आणला अशी महाभारतात एक कथा आहे. त्यातील लवणासुर म्हणजे समुद्र आणि त्याचा पराभव करून गुरुपुत्राला मुक्त केले असा समज कथाकारांनी निर्माण केला. रामाने समुद्राला शरण यायला लावले आणि त्याच्याकडून सेतू बांधण्याची परवानगी मिळविली या रामावतारातील कथेचा कृष्णावतारातील लवणासुरवधाच्या कथेवर परिणाम झाला असावा.

वस्तुतः लवण म्हणजे समुद्र असा लाक्षणिक अर्थ न घेता लवण नावाचा असुर असा सरळ (जसे शंखासुर) अर्थ घेतला म्हणजे लवणासुराचा वध करून गुरुपुत्राला सोडविले यात वास्तवता दिसून येते.

समुद्रावर आधिपत्य असल्यामुळे लवणासुर नावाच्या बलाढ्य राक्षसाचा पराभव केला यात शौर्य आहे, गुरुनिष्ठा आहे, पण चमत्कार नाही.

पुराणे, काव्ये, नाटके, कथा, कादंबऱ्या इत्यादी सर्व वाङ्मयप्रकारांत आकर्षकता वाढविण्याकरता शृंगार, वीर इत्यादी रसांप्रमाणे 'अद्‌भुत' रसाचाही आविष्कार केलेला असतो. इतकेच नव्हे तर शृंगारादिक रसांच्या परिपोषाकरता त्यांना अद्‌भुताची जोड दिलेली असते. महाकवी कालिदासाच्या विश्वविख्यात अभिज्ञान शाकुंतल नाटकात शकुंतलेच्या मुखाभोवती सुवासाच्या लोभाने गुंजारव करीत फिरणारा भुंगा, दुष्यंताच्या हातचे पाणी न पिणारे तृषार्त हरिणशावक, आठवण म्हणून दिलेली राजमुद्रांकित अंगठी नदीत पडणे, ती नेमकी माशाने गिळणे, तो मासा मासेमाऱ्याला मिळून ती अंगठी सापडणे वगैरे अनेक अद्‌भुत घटना कथानकाच्या उदात्तीकरणाकरता (मुळात नसताही) वर्णिल्या आहेत. पण त्या घटना चमत्कार नव्हेत. कारण त्या वास्तवात घडलेल्याच नव्हत्या.

तेव्हा पुराणांतील व इतर ग्रंथांतील चमत्कारांचा विचार करताना त्यांतील वास्तव आणि अद्‌भुतरस यांतील भेद लक्षात घेणे आवश्यक आहे. घटनांचे अद्‌भुतरम्य काव्यात्म वर्णन म्हणजे चमत्कार नव्हेत हे लक्षात ठेवलेच पाहिजे.

याचा अर्थ, जगात चमत्कार घडत नाहीत असा नाही. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातसुद्धा चमत्कार घडत असतात. सामान्य माणसांच्याच नव्हे; तर थोर विचारवंतांच्या, शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजीनियरांच्यासुद्धा बुद्धीला आकलन न होणाऱ्या,

त्यांचा कार्यकारणभाव न समजलेल्या अनेक घटना पूर्वापार घडत आल्या आहेत. घडत आहेत.

अतिरिक्त रक्तदाबामुळे (ब्रेन हॅमरेज) मेंदूतील तुटलेली रक्तवाहिनी कोणताही उपाय न करता आपोआप सांधते आणि आसन्नमरण रोगी पुढे दीर्घकाल जिवंत राहतो आणि हृदयव्यथेचा गंधही नसलेला धडधाकट मनुष्य बोलता बोलता हृदयक्रिया बंद पडून क्षणार्धात मरण पावतो. त्याचप्रमाणे अनेक विमानांचा आणि मोठमोठ्या बोटींचा बळी घेणारा 'बर्म्युडा ट्रॅंगल' हे व असे अनेक चमत्कार आहेत. ते पूर्वापार घडत आले आहेत.

साधुसंतांच्या चरित्रांत अशा अनेक चमत्कारांचे वर्णन वाचावयास मिळते.

या संदर्भात पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या जीवनातील एक चमत्कार सर्व दृष्टींनी मननीय आहे. योगेश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. ते महान भगवद्भक्त आहेत. पण त्यांची भक्ती कृतिशील भक्ती आहे. नैष्कर्म्यांत परिणत होणारी नाही. त्यांची प्रवचने व त्यांचे विशाल कार्य चमत्कारांवर आधारलेले नाही. ते पूर्णपणे वास्तवावर आधारलेले आहे. असे असताही कार्य करीत असता काही चमत्कार त्यांच्या अनुभवाला आले आहेत.

कच्छमध्ये त्यांनी काही एकर जागा खरेदी केली. तेथे 'योगेश्वर कृषी' किंवा 'वृक्षमंदिरम्' निर्माण करावे हा त्यात हेतू होता. योगेश्वर कृषी अथवा वृक्षमंदिर कोणा एकाच्या मालकीचे नसते. आजूबाजूच्या दहा-वीस गावांतील कार्यक्षम व्यक्तींनी पाळीपाळीने त्या क्षेत्रात काम करावयाचे. एका व्यक्तीला महिन्यातून वा दोन-तीन महिन्यांतून एक दिवस काम करावे लागते. त्यामुळे कोणाही व्यक्तीला ते शेत वा ती फळझाडे माझी आहेत, माझ्या श्रमाने बहरली आहेत असे म्हणता येत नाही. वाटत नाही. अशा रितीने त्या क्षेत्रातून झालेले उत्पन्न (त्याला पांडुरंगशास्त्री यांनी 'अपौरुषेय लक्ष्मी' असे अत्यंत समर्पक नाव दिले आहे.) आजूबाजूच्या सर्व गावांतील वृद्धांना, अपंगांना त्यांच्या घरी जाऊन देण्यात येते. येथे 'योगेश्वरो दाता आणि योगेश्वरो भोक्ता' अशी भूमिका असते. कोणीही व्यक्ती 'दाता' नाही व कोणीही व्यक्ती 'याचक' नाही.

अशा भूमिकेतून योगेश्वर कृषी वा वृक्षमंदिर निर्माण करण्याकरता खूप मोठी जमीन खरेदी करण्यात आली. पण त्यात पाणी कोठेच मिळेना. फार मोठा जटिल प्रश्न निर्माण झाला. पाणी कोठे लागेल याचा शोध घेण्याच्या दृष्टीने (काहीशा निराशेने) पांडुरंगशास्त्री व त्यांचे स्वाध्यायी त्या क्षेत्रात फिरत असता अकस्मात कपड्यांवरून खेडवळ वाटणारा एक म्हातारा माणूस काठी टेकीत टेकीत त्यांच्यासमोर उभा राहिला आणि म्हणाला, तुम्हांला पाणी पाहिजे ना? या माझ्याबरोबर. दाखवतो मी कोठे पाणी मिळेल ते! हातातील काठी टेकीत टेकीत पन्नास-शंभर पावले टाकल्यावर एके ठिकाणी काठी टेकून तो म्हातारा म्हणाला, येथे खणा विहीर. भरपूर पाणी लागेल. तेथे खुणा करून तो म्हातारा निघून गेला.

तेथे विहीर खणण्यात आली आणि चमत्कार घडला. विपुल पाणी लागले. शास्त्रीजींची समस्या सुटली.

नंतर आजूबाजूच्या गावांत बारकाईने तपास करूनही त्या व्यक्तीचा शोध लागला नाही.

(पृष्ठ ३२ वर)

## कौटिलीय अर्थशास्त्राची रचना आणि विषय

डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके

'अर्थशास्त्र' शब्दाचे स्पष्टीकरण, अर्थशास्त्राचा पूर्वेतिहास, कौटिल्याचे संक्षिप्त चरित्र इ. विषय जाणून घेतल्यावर प्रत्यक्ष कौटिलीय अर्थशास्त्रातील विषयांचे विस्तृत विवेचन करण्यापूर्वी या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय, त्याची विभागणी, रचना, शैली यांचा थोडक्यात आढावा घेणे योग्य ठरेल.

संपूर्ण अर्थशास्त्र या ग्रंथाची विभागणी एकूण १५ विभागांत केली असून त्यांना 'अधिकरण' असे सामान्य नाव आहे. या प्रत्येक अधिकरणाला त्यातील विषयाला अनुसरून विशेष नाव आहे. प्रत्येक अधिकरणाचेही उपविभाग केले असून त्यांना 'अध्याय' आणि 'प्रकरण' अशी सामान्य नावे आहेत. अधिकरणांप्रमाणेच अध्याय आणि प्रकरणांनाही त्यांतील विषयांना अनुसरून विशेष नावे आहेत. अशा रितीने संपूर्ण अर्थशास्त्रात एकूण १५ अधिकरणे, १५० अध्याय आणि १८० प्रकरणे आहेत, असे या ग्रंथातच पहिल्या अध्यायात नमूद केले आहे. या अधिकरणांपैकी पहिली पाच अधिकरणे अंतर्गत राज्यकारभारविषयक विवेचन करणारी असून त्यांतील विषयाला 'तंत्र' ही संज्ञा आहे. यापुढील आठ अधिकरणे परराष्ट्रीय धोरणांची चर्चा करतात. या अधिकरणांतील विषयाला 'आवाप' ही संज्ञा आहे. अशा रितीने १ ते १३ या अधिकरणांतील विषय अर्थशास्त्र या विषयाशी साक्षात संबंधित आहेत. प्रथम ही १३ अधिकरणे, त्यांची नावे आणि मुख्य विषय पाहू.

**अधिकरण १ - विनयाधिकरण -** राजाचे शिक्षण, अमात्य, मंत्री, पुरोहित, हेर, दूत इ. च्या नेमणुका व त्यांचे कार्यक्षेत्र, राजाचे दैनंदिन व्यवहार.

**अधिकारण २ - अध्यक्षप्रचार -** किल्ल्यांची बांधणी, त्यांतील वसाहती, नगररचना, राजाने नेमलेल्या विविध अध्यक्षांची कर्तव्ये आणि कार्यक्षेत्र.

**अधिकरण ३ - धर्मस्थीयम् -** न्यायदान, न्यायाधीशांची कर्तव्ये, वारसाहक्क, विवाह, कर्ज, ठेवी, दास, चोरी, बळजबरी, मारामारी, जुगार इ. विषयी प्राचीन कायदे.

**अधिकरण ४ - कंटकशोधन -** समाजकंटकांचे निर्मूलन. या कंटकांमध्ये ग्राहकांना फसविणारे कारागीर, व्यापारी, लाचखाऊ अधिकारी, चोर, दरोडेखोर यांनी केलेल्या गुन्ह्यांचा तपास व शासन.

**अधिकरण ५ - योगवृत्तम् -** गुप्तव्यवहार, राजद्रोह्यांचा बंदोबस्त, सरकारी नोकरांचे पगार इ. विषयी विवेचन.

**अधिकरण ६ - मण्डलयोनि -** परराष्ट्र धोरणांसाठी पायाभूत असलेल्या राज्याच्या ७ घटकांची व राजा, त्याचा शत्रू, मित्र, त्रयस्थ राजा इ. नी युक्त 'राजमण्डल' संकल्पनेचे विवेचन.

**अधिकरण ७ - षाड्गुण्य -** परराष्ट्रविषयक, तह, युद्ध, सलोखा, तटस्थता इ. सहा धोरणांचा विचार.

**अधिकरण ८ - व्यसनाधिकारिकम् -** राज्याच्या घटकांवर येणारी संकटे, राजा, राज्य, कोश, सैन्य, मित्र यांसंबंधातील संकटे.

**अधिकरण ९ - अभियास्यत्कर्म -** मोहिमेवर जाण्याची तयारी.

**अधिकरण १० - सांग्रामिकम् -** संग्रामविषयक विचार.

**अधिकरण ११ - संघवृत्तम् -** संघराज्यांविषयीची विविध धोरणे.

**अधिकरण १२ - आबलीयसम् -** बलहीन झालेल्या राजाने आत्मसंरक्षण कसे करावे, बलाढ्य शत्रूलाही नामोहरम कसे करावे याचे विवेचन

**अधिकरण १३ - दुर्गलम्भोपाय -** शत्रूची राजधानी असलेला दुर्ग कसा जिंकावा व जित राज्यातील प्रजाजनांना द्यायची वागणूक याविषयी मार्गदर्शन.

अधिकरण १४ व १५ यांतील विषय, ग्रंथाच्या विषयाशी साक्षात संबंधित नाहीत. यांपैकी चौदाव्या अधिकरणात जारणमारण, मंत्रसिद्धी इ. गूढ विषयांचे विवेचन आहे. अर्थशास्त्रात अनेक ठिकाणी गूढ प्रयोगांचा अवलंब करावा असे म्हटले आहे.

शेवटच्या १५ व्या अधिकरणात - ज्याचे नाव 'तन्त्रयुक्ति' असे आहे - शास्त्रीय ग्रंथांत विषयांची मांडणी संगतवार आणि सुसूत्र कशी करावी याविषयी सोदाहरण विचार केला आहे.

अर्थशास्त्रातील पंधरा अधिकरणांतील विषयसूची पाहिल्यावर कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथाचा विस्तृत आवाका, राजनीती आणि अर्थशास्त्र या दोन्ही विषयांचा कौटिल्याने केलेला सांगोपांग, सुसूत्र, सर्वमतसमावेशक विचार दिसून येतो. या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात कौटिल्याने १८० अध्यायांची नावे दिली आहेत. एका अर्थी ही या ग्रंथाची अनुक्रमणिकाच आहे. ग्रंथाच्या या पहिल्या अध्यायातच कौटिल्याच्या तर्कशुद्ध, विश्लेषक आणि त्रिकालवेधी प्रज्ञेची चुणूक निदर्शनास येते. कौटिलीय अर्थशास्त्रापूर्वीचे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. कौटिलीय अर्थशास्त्रानंतर राजनीतीवर अनेक ग्रंथ रचले गेले, परंतु त्यांत कौटिलीय अर्थशास्त्रापेक्षा वेगळे काही सांगितलेले आढळत नाही. भारतीय अर्थशास्त्र व राजनीतीच्या परंपरेत हा ग्रंथ असाधारण व त्रिकालाबाधित आहे.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २,
रघुनाथ नगर, तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

**ऐकावं ते नवलच**

**थडग्यांवर संस्कृत लेख...**

काश्मिरांत अनेक ठिकाणी जुन्या मुसलमानी थडग्यांवर असलेले छोटे छोटे लेख संस्कृतांत आहेत, असे स्टीनसाहेबानी १८९८ च्या सुमारास नमूद करून ठेवले आहे !!!

- Introduction, Rajatarangini, p.131, Foot-note.

●●●

वेदविद्या किंवा जे वेदान्त-तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते त्याने आम्हांला ॐ हा महान एकाक्षर बीजमंत्र दिला आहे. सर्वांचे 'आदी' असे जे 'ब्रह्मतत्त्व' त्याला ज्ञानेश्वरांनी 'वेदप्रतिपाद्या' असे संबोधित केले आहे. कारण वेदामध्ये त्या इंद्रियातीत निराकार परब्रह्माचे वर्णन करताना ते शब्दातीत असून त्याचे शब्दांत वर्णन करता येणार नाही असेही म्हटले आहे आणि शेवटी 'नेति' 'नेति' या पद्धतीचा अवलंब करून त्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे, शेवटी ॐ या शब्दध्वनीमध्ये ते कसे गोवले गेले आहे हे दाखवून 'ॐ' हे एकाक्षर बीज त्या ब्रह्माचे सर्वार्थाने एकमेव प्रतीक आहे असे प्रतिपादन केले आहे आणि म्हणून वेदान्तर्गत सर्व मंत्रांची सुरुवात ॐ या एकाक्षर बीजानेच केली जाते. ॐ या एकाक्षराच्या उच्चाराने आपण ब्रह्माचे जे दृश्य रूप त्या ब्रह्मांडालाच जणू गवसणी घालतो म्हणून त्याला 'नादब्रह्म' असेही म्हटले जाते. 'ॐ' हे जणू ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचे प्रवेशद्वारच आहे. ॐ नमः शिवाय । ॐ नमो भगवते वासुदेवाय । अशा पौराणिक मंत्रांची सुरुवातही ॐ या बीजाक्षरानेच होते.

प्रत्यक्ष भगवंताने, गीतेच्या ८ व्या अध्यायाच्या १३ व्या श्लोकात याच विधानाला पोषक असे विधान केले आहे.

ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥१३॥

**मराठी अनुवाद**

ओम् एकाक्षर जपता अंतरी स्मरता मज ।
जाई जो देह सोडून तो लाभे गति उत्तम ॥१३॥

भगवन्ताने तर ॐ या एकाक्षर बीजाला (वरील श्लोकात) ब्रह्मच म्हटले आहे.

वेदांप्रमाणे ॐ हा मंत्रही सनातन आहे म्हणजेच त्रिकालातीत आहे.

अशा या अक्षरब्रह्मावरची विपुल व्यापक अशी माहिती आपल्याला माण्डूक्योपनिषदात वाचावयास मिळते. हे उपनिषद म्हणजे ॐ बीजाक्षरावरचे परिपूर्ण प्रवचनच आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

ॐ (ओम्) या उच्चारात 'अ' 'उ' व 'म' अशा तीन घटक मात्रा गोवल्या आहेत व शेवटी ँ(चंद्राकित बिन्दू) हा चौथा घटकही त्यांत आहे. याला तीन मात्रांच्या पलीकडील अशी अर्धमात्राही म्हणतात. 'ब्रह्मतत्त्व' हे निराकार व म्हणून अदृश्य आहे. बऱ्याचश्या अदृश्य गोष्टी आपण नेत्रांनी नाही, पण दुसऱ्या कुठल्यातरी इंद्रियाने जाणू शकतो. जसे वारा दिसत नाही, पण स्पर्शाने कळतो. फुलातील सुगंध दिसत नाही, पण वासाने (घ्राणेंद्रियाने) कळतो. पण 'ब्रह्मतत्त्व' मात्र आपल्या पाचही इंद्रियांना गोचर होत नाही. म्हणजे ते इंद्रियातीत आहे. असे हे 'ब्रह्मतत्त्व' केवळ ज्ञानचक्षूंनी आपल्या अंतरातच आत्मरूपात अनुभवायचे असते असे वेदविद्या

सांगते. म्हणून ज्ञानेश्वरांनी त्याला (ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ओवीतच) स्वसंवेद्या आत्मरूपा असे संबोधिले आहे.

असे हे 'ब्रह्मतत्त्व' इंद्रियातीत म्हणजे इंद्रियांना गोचर होऊ शकत नसले, तरी त्याने निर्माण केलेल्या वस्तूंमधून किंवा निसर्गामध्ये त्याच्या कारणामुळे होणाऱ्या असंख्य चमत्कारांमधून आपल्याला त्याच्या अस्तित्वाची खातरी मात्र पटू शकते. अशा ज्या तीन मुख्य प्रकारांनी आपल्याला ब्रह्माच्या अस्तित्वाची जाण होते. त्यांना या उपनिषदात ब्रह्माचे तीन पाद म्हटले आहे. 'अ' 'उ' व 'म' या तीन मात्रा त्याच्या या तीन पादांचेच प्रतीक आहेत हे दाखवताना जिवाच्या 'जागृती', 'स्वप्न' व 'सुषुप्ती' या तीन अवस्थांशीही त्यांचा संबंध या उपनिषदात दाखविला आहे.

**प्रथम पाद :**

जागृतावस्थेत पंचेंद्रियांच्या साहाय्याने आपण हे अनंत ब्रह्मांड पाहू शकतो व याचा कोणीतरी कर्ता असला पाहिजे असा विचार आपल्या मनात येतो. या सृष्टीतील, बीजातून वृक्ष निर्माण होणे, कालच्या कळीचे आज सकाळी फूल फुललेले दिसणे वगैरे अनेक चमत्कार आपल्याला असाच विचार करावयास लावतात. चंद्राचे पृथ्वीभोवती आणि पृथ्वीसकट सर्व ग्रहांचे सूर्याभोवती ठरावीक गतीने घड्याळाबरहुकूम भ्रमण होणे वगैरे कल्पनातीत गोष्टी पाहिल्या की या सर्व सृष्टिक्रमाचे नियंत्रण करणारी कोणतीतरी अतिमानवी शक्ती (इंद्रियांना गोचर होत नसली तरी) अस्तित्वात असली पाहिजे अशी अगदी वैज्ञानिक दृष्टीच्या मानवाचीसुद्धा खातरी पटते. या सर्व अनंत ब्रह्मांडाची गोष्ट तर सोडाच, पण माणसाच्या शरीरांतर्गत 'पचन' 'रुधिराभिसरण' आदी संस्थांच्या क्रियांचा अभ्यास केल्यावर, यासर्व क्रिया चालवणारी व या निरनिराळ्या संस्थांच्या कार्यांचा समन्वय साधून त्यावर नियंत्रण करणारी अशी कोणतीतरी केंद्रीय शक्ति असली पाहिजे अशी आधुनिक जीवशास्त्रज्ञांचीही धारणा होत चालली आहे. जागृतावस्थेत बाह्य कर्मेंद्रियांवर आपले नियंत्रण असते; पण पचन, रुधिराभिसरण इ. क्रियांवर आपले नियंत्रण अजिबात नसते. जठरात अन्न पोहोचल्यावर जाठररस स्रवण्यास सुरुवात होणे, अन्नात पिष्टमय पदार्थ, प्रथिने किंवा स्निग्ध पदार्थ किती प्रमाणात आहेत त्याप्रमाणे योग्य प्रमाणात स्वादुरस व पित्तरस अन्नात सोडणे वगैरे क्रिया आपल्या नकळत आपोआप कशा होणार? वेळोवेळी योग्य निर्णय घेऊन या सर्व अंतर्गत क्रिया-प्रक्रियांवर नियंत्रण करणारी कोणतीतरी अदृश्य शक्ती असल्याशिवाय, शरीरांतर्गत विविध क्रियांचे असे संचालन होणे शक्यच नाही. या अंतर्गत ऊर्जायुक्त शक्तीला एक अग्नीचेच रूप म्हणून 'वैश्वानर' या संज्ञेने वेदविद्येत संबोधिले जाते.

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥१४॥

**मराठीत**

वैश्वानराग्नि होऊन वसे मी भूतदेहिंच ।
प्राणें अपानें पचवी मीच अन्न चतुर्विध ॥१४॥

मीच प्राण्यांच्या शरीरांत 'वैश्वानर' रूपात वसत असतो व मीच त्यांचे चतुर्विध (पिष्टमय, प्रथिने, स्निग्ध व जीवनसत्त्वेयुक्त) अन्न पचवितो,

असे भगवंत गीतेच्य पंधराव्या अध्यायात सांगतात. या तऱ्हेने जागृतावस्थेत इंद्रियांच्या साहाय्याने गोचर होऊन ब्रह्मतत्त्वाच्या अस्तित्वाची जाण देणाऱ्या सर्व गोष्टींना या माण्डूक्योपनिषदात ब्रह्माचा पहिला पाद म्हटले आहे व त्यांना 'वैश्वानर' हे एक सामूहिक नाव दिले आहे.

बीजाक्षराची पहिली मात्रा जी 'अ' ती या पहिल्या पादाचे प्रतिनिधित्व करते असे हे उपनिषद सांगते आणि या मात्रेचा संबंध माणसाच्या 'जागृतावस्थेशी' दाखविला आहे.

**दुसरा पाद :**

आता इंद्रियांहूनही श्रेष्ठ जे मन त्याचे अद्भुत सामर्थ्य व व्यापार यांच्या माध्यमातूनही त्या ब्रह्मतत्त्वाच्या अस्तित्वाचा बोध आपण घेऊ शकतो. हे या उपनिषदाच्या ४थ्या वाक्यात सांगितले आहे. जागृतीनंतर देहाची दुसरी अवस्था म्हणजे स्वप्न. आपल्याला झोप (निद्रा) लागली म्हणजे आपली ज्ञानेंद्रिये कार्यनिवृत्त होतात व त्यांना जोडलेली 'जाणीव' ही मंद होते. म्हणजेच आपले हे स्थूल काम करणारे शरीर झोपते किंवा त्या स्थूल अनुभवापासून सुटते. त्या वेळी आपले आतले मन (Subconciousness) जागरूक असते आणि ते मन संकल्प-विकल्प-निर्णय करीत असते, कल्पना करीत असते आणि त्या कल्पनेची चित्रे त्या मिटलेल्या डोळ्यांपुढे दिसावयास लागतात. अशा स्वप्नांत आपण जणू दुसरी सृष्टीच निर्माण करतो. हे ज्याच्यामुळे घडू शकते तो (ओमकाराचा) ब्रह्मतत्त्वाचा दुसरा पाद होय आणि त्याचेच प्रतीक म्हणजे ओमकाराची दुसरी मात्रा 'उ' होय. आपण डोळे मिटून काळोखात झोपलो असलो तरी स्वप्नातील काल्पनिक सृष्टीत मात्र स्वच्छ प्रकाशात वावरत असतो. म्हणून या दुसऱ्या पादाला 'तैजस' अशी संज्ञा या उपनिषदात दिली आहे.

**तिसरा पाद :**

मनाहूनही बुद्धीला श्रेष्ठ म्हटले आहे. या बुद्धीच्या माध्यमातूनही आपल्याला ब्रह्माच्या एका विशिष्ट पैलूचा अनुभव येतो. इंद्रियांकरवी मनाने आणलेल्या माहितीचे बुद्धी विश्लेषण करते. का व कसे असे प्रश्न विचारून संशय दूर करून खरे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करते. पण या बुद्धीच्या सामर्थ्यालाही माणसाच्या बुद्धिमत्तेप्रमाणे मर्यादा असतातच. एखादे कोडे सोडविताना माझी बुद्धी चालत नाही असे म्हणून आपण त्याचा विचार सोडून देतो व नंतर केव्हातरी दुसरेच काम करीत असताना अचानक (आकाशात वीज चमकावी तशी) त्या कोड्याचे उत्तर आपल्या डोकयात चमकून जाते. न्यूटन व आइन्स्टाइन यांच्यासारख्या बुद्धिमंतांनी जे क्रांतिकारक शोध लावले त्यांची मूळ कल्पना त्यांना अशाच अचानक दैवी अनुभवातून सुचली असे त्यांनीच त्यांच्या निवेदनात सांगितले आहे.

रामानुजनना स्फुरलेली अंकांची काही समीकरणे (की ज्यांची उपपत्ती गणितज्ज्ञ आजही कॉम्प्युटरच्या साहाय्यानेसुद्धा लावू शकले नाहीत.) ही याच प्रकारात मोडतात. काही माणसांत उपजतच असलेल्या कला किंवा विद्या देवदत्तच मानल्या जातात. अशा ज्या प्रकारातून आपल्याला ब्रह्मतत्त्वाच्या अस्तित्वाची जाणीव होते त्याला या उपनिषदात ब्रह्माचा तृतीय पाद म्हटले आहे. या उपनिषदात या तृतीय पादाचा

संबंध शरीराच्या 'सुषुप्ती' या तिसऱ्या अवस्थेशी दाखविला आहे. सुषुप्ती म्हणजे गाढ निद्रा, जिच्यात इंद्रियांबरोबर मनाचेही सर्व व्यापार थांबलेले असतात आणि म्हणून स्वप्नेही पडत नसतात. स्वप्नावस्थेत पडणारी स्वप्ने खोटी व अर्थहीन असतात. सुषुप्तीत अशी स्वप्ने पडत नाहीत, पण क्वचितप्रसंगी काही व्यक्तींना घडणारे दृष्टान्त किंवा पुढील घटनांबाबत मिळणाऱ्या सूचना या मात्र सुषुप्ती अवस्थेतच शक्य असतात. असे संदेश हे त्या ब्रह्मतत्त्वाकडून आलेले असतात व ते खरे असतात (ठरतात). या तृतीय पादाला 'प्राज्ञ' ही संज्ञा दिली आहे. कारण या पादाचा बुद्धिस्पर्श होऊन मानवाला अद्भुत कल्पना सुचतात किंवा इंद्रियातील ज्ञानाचा लाभ होतो. 'अ', 'उ' व 'म' या तीन मात्रांनी दर्शविलेल्या ब्रह्मतत्त्वाच्या तीन पादांन्वये मानवाला त्या इंद्रियातीत ब्रह्मतत्त्वाचा अप्रत्यक्ष अनुभव येतो व तोसुद्धा काही विशिष्ट पैलूंचा असा मर्यादित स्वरूपाचा असतो. त्याचा प्रत्यक्ष अनुभव हा योग्याला ज्ञानचक्षूंनी केवळ आत्मस्वरूपामध्येच मिळू शकतो. इंद्रिये मन व बुद्धी या पलीकडील परश्रेष्ठ तत्त्व मात्र आपल्या अंतरातच आत्मरुपात (शुद्ध आत्मा) वसत असते. हे वदान्तातील 'मूळ तत्त्व' ईशावास्योपनिषदात पहिल्या ऋचेच्या पहिल्या चरणातच सांगितले आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।

ज्ञानेंद्रिये -मन-बुद्धी आणि त्यांच्यापेक्षाही परश्रेष्ठ असा आत्मा हा अनुक्रम भगवंताने गीतेच्या तिसऱ्या अध्यायात शेवटी असा सांगितला आहे :

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः॥४२॥

**मराठीत**

देहात इंद्रिये श्रेष्ठ इंद्रियांहून ते मन।
श्रेष्ठ बुद्धी मनाहून आत्मा बुद्धीहुनी पर॥४२॥

पंचमहाभूते, मन, बुद्धी व अहंकार असे हे आठ माझ्या अपरा प्रकृतीचे घटक आहेत. पण सर्व जिवांतील प्राण किंवा चैतन्य (आत्मा) हा माझ्या 'परा' प्रकृतीचा घटक आहे; म्हणूनच ते परतत्त्व आहे असे भगवंत गीतेच्या सातव्या अध्यायात सांगतात. (अ.७ श्लोक. ४.५)

'अ' 'उ' व 'म' या तीन मात्रांनंतर त्या मात्रांच्या पलीकडला (परश्रेष्ठ) असा ॐ बीजाक्षराचा चौथा भाग म्हणजे ँ अर्धचंद्रांकित बिंदू होय. या चौथ्या भागाशिवाय ओम्कार पूर्ण होत नाही.

ईशोपनिषदात सांगितलेल्या परमात्म्याच्या आपल्या अंतरात वसत असलेल्या आत्मरुपातील अंशास ब्रह्माचा चतुर्थ किंवा सूक्ष्म पाद म्हटले आहे. अशा या इंद्रियातीत, शब्दातीत आत्मरूपाचा (योगसाधनेने) ज्ञानचक्षूंनी प्रत्यक्ष अनुभव घेणे हेच मानवाचे अंतिम ध्येय असावे असे वेदविद्या सांगते आणि अशा अनुभवाचे प्रतीक (Symbol) ँ अर्धचंद्रांकित बिंदू म्हणजेच बीजाक्षराचा हा तुरीय भाग आहे असे माण्डूक्योपनिषद सांगते.

याप्रमाणे 'अ' 'उ' व 'म' या तीन पायऱ्यांनी योगसाधना करून आत्मज्ञानप्राप्तीची संपूर्ण प्रक्रियाच ॐ या बीजाक्षरात गोवलेली

आहे असे या उपनिषदाचे मुख्य प्रतिपादन आहे. वर चार चरणांचा (तीन मात्रा व चौथा ँ) म्हणून वर्णन केलेला आत्मा (परमात्म्याचा अंश) जर अक्षरांमध्ये निर्देश करावयाचा असेल तर ॐ या एकाच बीजाक्षराने पूर्णपणे वर्णन केला जाऊ शकतो असे हे उपनिषद सांगते.

उपनिषदाच्या उत्तरार्धात (वाक्य ९ ते १२) ॐकाराच्या साधनेविषयी थोडेसे विवेचन आहे. ज्ञानचक्षूंनी आत्मरूपाचा प्रत्यक्ष अनुभव हा जरी केवळ ँ अर्धचंद्रांकित बिंदू या चतुर्थ भागाने निर्देशित होत असला, तरी ज्याप्रमाणे ॐ चा उच्चार पहिल्या तीन मात्रांशिवाय पूर्ण होत नाही. त्याप्रमाणे ॐ साधनाही, तीन मात्रांनी निर्देशित केलेल्या साधनेच्या तीन पायऱ्यांशिवाय (या तीन पायऱ्यांनी गेल्याशिवाय) सिद्ध होऊ शकत नाही.

**पहिली पायरी** :(‘अ’ मात्रेने निर्देशित केलेली) परमेश्वराने या प्रकृतिअंतर्गत आपल्या जीवनासाठी ज्या गोष्टी योजलेल्या आहेत, त्यांचाच उपभोग घ्यावयाचा, दुसऱ्यांसाठी योजलेल्या किंवा दुसऱ्यांच्या मालकीच्या वस्तूंवर आक्रमण करावयाचे नाही. ‘मा गधः कस्य स्विद् धनम्।’ (ईश) आपल्या संसारात पुढे आलेली कर्तव्ये, परमेश्वरानेच आपल्यासाठी नेमून दिली आहेत अशी जाणीव ठेवून ती कोणतीही फळाशा न ठेवता सर्व बलबुद्धी पणाला लावून पार पाडणे, थोडक्यात कर्मयोगाच्या युक्तीने, पुढे आलेली कर्मे, आपण ईश्वराचीच आज्ञा पाळत आहोत या जाणिवेने करीत राहणे ही (‘अ’ या मात्रेने निर्देशित) या साधनेची पहिली पायरी होय.

**दुसरी पायरी** : (‘उ’ या मात्रेने निर्देशित)

विषयांकडे धावणाऱ्या इंद्रियांना मनाने निमंत्रित ठेवणे. काम, क्रोध आदि षड्रिपूंना मनात थारा न देता मन शुद्ध ठेवणे, थोडक्यात अंतर्मुख होऊन आपले चित्त परमेश्वरावर स्थिर करणे, ही या साधनेची दुसरी पायरी होय. शुद्धमन (हेतू) आणि सदाचाराशिवाय केलेली तपःसाधना ही रावण किंवा बाणासुराने केलेल्या तपःसाधनेप्रमाणे शेवटी फलद्रुप न होता अधःपातासच कारण होते, यावरून या दुसऱ्या पायरीचे महत्त्व लक्षात येईल.

**तिसरी पायरी** : (‘म’ या मात्रेने निर्देशित)

‘म’ कार हा सुषुप्ती-अवस्थेचा आहे. आपले प्रत्येक काम मनाप्रमाणे पूर्ण व यशस्वी झाले आहे. त्यामुळे मनाला पूर्णपणे समाधान लाभले आहे. त्यात कोणत्याही तऱ्हेचा क्षोभ, काळजी किंवा अस्वस्थता नाही, अशा स्थितीत आपल्याला शांत व स्वस्थ झोप लागते. कोणतीही स्वप्ने पडत नाहीत, म्हणजेच सुषुप्ती अवस्था लाभते. अशा अवस्थेतच क्वचितप्रसंगी बुद्धी ऐहिक जग सोडून पारमार्थिक स्तरावर विहार करू लागते व काही क्षणांसाठी का होईना त्या परमतत्त्वाशी अनुसंधान साधते. माणसाला दैवी किंवा दिवंगत महात्म्यांचे दृष्टान्त घडतात. हीच सुषुप्तीसदृश अवस्था, योगसाधनेने बुद्धी एकाग्र करून माणसाला जागृतावस्थेतही मिळू शकते. एखादा शास्त्रज्ञ, बुद्धी एकाग्र करून त्याच्यापुढे असलेल्या वैज्ञानिक प्रश्नावर चिंतन करता करता आपले देहभान विसरतो आणि त्या (जागृतीतल्या) सुषुप्ती अवस्थेत त्याला अचानक त्या प्रश्नांचे उत्तर मिळते. ते उत्तर त्याच्या बौद्धिक उपचारांमधून मिळालेले नसते, तर कोणत्यातरी बाहेरच्या शक्तीने ते आपल्याला सुचविल्यासारखे

त्याला भासते. ही ब्रह्माच्या तिसऱ्या पादाचीच लीला म्हणावयास हरकत नाही.

**तुरीया अवस्था** :(ँ अर्धचंद्रांकित बिंदूने निर्देशित)

ही अवस्था 'त्रिमात्रातीत' म्हणजे या तीन मात्रांच्या पलीकडची आहे. ही अवस्था काही अंशी 'म' अवस्थेसम असली तरी बुद्धीची चाल बाहेरच्या ऐवजी आतल्या दिशेला वळवलेली असते. 'म' अवस्थेत जसे शास्त्रज्ञ जड शास्त्रीय प्रश्नावर (म्हणजे बाह्यदिशेला) बुद्धी एकाग्र करतो, तर या तुरीया अवस्थेत योगी (यो बुद्धेः परतस्तु सः अशा) आत्म्यावर बुद्धी एकाग्र करतो (चिंतन करतो) म्हणजेच बुद्धी अंतर्दिशेकडे वळवितो. 'स' अवस्थेत शास्त्रज्ञाला, परमात्म्याचा (वैश्विक बुद्धीच्या रूपात) बुद्धिस्पर्श काही क्षणांपुरता होतो, तर तुरीया अवस्थेत योग्याला त्या परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन बुद्धीच्या ज्ञानचक्षूंनी 'आत्मरूप' स्वरूपात अनुभवयास मिळते. आणखी प्रगत अवस्थेत तो योगी त्याच्याशी (आत्मरूपाशी) अद्वैतच साधतो. या अवस्थेलाच 'ब्रह्मज्ञान होणे', 'ब्रह्मीभूत होणे', 'ईशदर्शन होणे' वगैरे संज्ञा आहेत. अशी या तीन अवस्थांतून तुरीया अवस्थेत नेऊन ब्रह्मप्राप्ती करून देणारी प्रक्रिया ॐ या एकाक्षरी मंत्रात कशी पूर्णपणे सामावलेली आहे, हेच माण्डूक्योपनिषदात केवळ १२ वाक्यांत समजावून सांगितले आहे. ॐ हे खऱ्या अर्थाने ब्रह्मविद्येचे प्रतीक आहे म्हणजे ते बीजाक्षर जणू प्रत्यक्ष ब्रह्मच होय, असेच 'ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म' हे गीतावचन ध्वनित करते, असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाह नाही.

असे हे माण्डूक्य उपनिषद! ओमूकाराचा आधार घेऊन ते आपली खरी ओळख आपल्यालाच करून देते!

''अयम् आत्मा ब्रह्म'' हे या उपनिषदाचे महावाक्य आहे.


**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५


●●●

१ एप्रिल २०१५ पासून टपाल खात्याने मनीऑर्डर सेवा बंद केल्याची घोषणा केलेली आहे. याचा परिणाम म्हणून या पुढे आपणास ट्रस्टकडे देणगी व इतर गोष्टीसाठी पैसे मनीऑर्डरने पाठविता येणे आता शक्य नाही. हे सर्व व्यवहार आता बँक व माहिती-तंत्रज्ञान सुविधांचा उपयोग करूनच करावे लागणार आहेत. महिती-तंत्रज्ञान क्षेत्रात आज मोठी प्रगती झाली आहे. या प्रगतीचा उपयोग करून ''सद्धर्म''च्या सर्व देणगीदार सभासदांशी नियमित संपर्क वाढवण्याचा हा प्रयत्न असून सुरुवात करण्यासाठी सर्व सभासदांस अशी नम्र विनंती आहे की त्यांनी आपले संपर्कासाठीचे दूरभाष, भ्रमणध्वनि क्रमांक व असल्यास इ-मेल पत्ता ''सद्धर्म'' कार्यालयास पाठवावेत. हे सर्व SMS वा फोन करून ९८१९६९३१९५ या भ्रमणध्वनि क्रमांकावर वा **dikprak@gmail.com** वर पाठवावेत. त्यात आपले संपूर्ण नाव व सभासद क्रमांक नमूद करावा म्हणजे योग्य ती नोंद घेणे सोपे व सोयीचे होईल. सर्व देणगीदार व हितचिंतकांनी लवकरात लवकर संपर्क साधून सहकार्य करावे ही विनंती आहे.

**- संपादक / कार्यकारी विश्वस्त**

झाले. ख्रिस्त हा त्या सर्वांचा प्रेषित आणि बायबल हा एकच धर्मग्रंथ असला, तरी वास्तवाशी असलेला विरोधाभास जुळवून घेण्याकरता; प्रत्येक पंथाचे अनुयायी बायबलमधील वचनांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे बदलून घेऊ लागले. एकविसाव्या शतकातील अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रामध्येही बहुसंख्य ख्रिस्ती समाजाचा गर्भपात, जैविक तंत्रज्ञान किंवा तत्सम वैज्ञानिक प्रगतीला आजही कडाडून विरोध होताना दिसतो. इस्लामचा उदय हा तुलनेने नवा म्हणजे सातव्या शतकातील असला तरी गेल्या १२००-१३०० वर्षांत त्यामध्येही अनेक पंथ आणि उपपंथ निर्माण झाले. या दोन्हीही धर्मांत युरोपमध्ये धर्मयुद्धे झाली आणि आजही ती चालू आहेत.

भारतातील परिस्थितीही वेगळी नाही. वैदिक आणि व्यापक हिंदू धर्म आणि बौद्ध, जैन ते अलीकडील शीख पंथ हे सर्वच 'धर्मवचने' आणि 'वास्तव' यांतील विसंगती दूर करण्याकरता नवीन अभिनिवेश घेऊन जन्माला आले. 'हिंदू' म्हणजे कोण याची व्याख्या आधीही केली गेली नाही आणि आजही करता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा एक प्रेषित नाही किंवा एक धर्मग्रंथही नाही. 'श्रद्धा' आणि 'अश्रद्धा' या दोघांनाही या जीवनशैलीमध्ये सामावून घेतले गेले. व्यक्तीला तिचे देव, उपासनापद्धती आणि श्रद्धास्थाने निवडण्याची मुभा होती. साहजिकच आपले तेहतीस कोटी देव आणि दर बारा कोसांवर बदलणारी बोली भाषा याच लवचीकपणाचे द्योतक आहेत.

साहित्य, कला, विज्ञान या कशाच्याच निर्मितीच्या आड या धर्मश्रद्धा येत नव्हत्या. गणित, ज्योतिष असो की अगदी कामसूत्रे असोत, त्यांच्या लिखाणाकरता कोणालाच धर्मबाह्य करण्यात येत नव्हते. उपासनापद्धतीत नसली, तरी एकंदरीत जीवनरचनेमध्ये वर्णाश्रमधर्म, पुनर्जन्म आणि कर्मसिद्धान्त या संकल्पनांची वीण कमीअधिक प्रमाणात मजबूत होती. नीती, अनीती, चांगले-वाईट, पाप-पुण्य या सगळ्या संकल्पना समजाबांधणीकरता यांतूनच निर्माण होत होत्या. काही अभ्यासकांच्या मते रामायण, महाभारत आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथांत, प्रत्येक शतकामध्ये बदलणाऱ्या नवीन संदर्भांना सामावून घेण्याकरता बदल होत गेले. आपली पुराणे ही याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून घेता येईल. यांची संख्या वाढली एवढेच नाही तर त्यांतील कथाही वाढत गेल्या. यामधील काही कथा तर वास्तवापासून इतक्या विसंगत आहेत, की श्रद्धाळू माणसालाही त्यांवर विश्वास ठेवणे कठीण वाटू लागले. तरीही हे वाङ्मय अतिशय महत्त्वाचे आहे, कारण ते गेल्या २-३ हजार वर्षांच्या समाजाच्या चालीरिती, विश्वास आणि त्यांतील बदल यांचे प्रतिबिंब आहे. म्हणूनच पुराणातील प्रत्येक गोष्ट ही खरी नसली, तरी ते सर्व वाङ्मय भाकड आहे; अशी समजूत करून घेणे हीसुद्धा मोठी घोडचूक होईल. या सर्व गोंधळ निर्माण करणाऱ्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरताच कदाचित, वेळोवेळी पुढे आचार्यांचीही निर्मिती झाली. या आचार्यांना प्रस्थानत्रयी म्हणजे ब्रह्मसूत्र, उपनिषदे आणि भगवद्गीतेवर आपले विचार मांडून समाजाला मार्गदर्शन करावे लागत होते. अर्थातच त्यांच्या

लिखाणामध्येही बदलत्या वास्तवामुळे बदल होत होता. आपले सर्व आचार्य आठव्या ते पंधराव्या शतकांमधील आहेत. हळूहळू मूळ जीवनशैलीमध्ये असलेला लवचीकपणा कमी होत जाऊन आचार्य आणि त्यांचे लिखाण म्हणजे प्रेषित आणि त्यांचे ग्रंथ असे स्वरूप त्यांना प्राप्त झाले. या प्रत्येक आचार्यांचा एक पंथ होऊन, अनुयायांनी त्यांना बंदिस्त करून टाकले.

सातव्या/आठव्या शतकात आपल्या देशावर इस्लामी आक्रमणे चालू झाली ती अगदी सोळाव्या शतकातील ईस्ट इंडिया कंपनीपर्यंत अव्याहतपणे चालू होती. साहजिकच हा संस्कृतींमधील संघर्ष, मूळ संस्कृतींमध्ये आलेली बेदिली, यामुळे एकंदरीतच मूळ प्रवाहामध्ये बदल होण्याऐवजी त्याला विकृत स्वरूप यायला लागले. परकीयांशी झगडणे, हा 'अस्तित्वा'चा मूळ मुद्दा ठरला; तो अगदी १९४७ च्या स्वातंत्र्यापर्यंत. भाषा, ग्रहगणित, वैद्यक, स्थापत्य, राज्यशास्त्र, व्यापार, विधी, सर्व कला आणि साहित्य यांमध्ये प्रचंड सर्जनशीलता दाखविणारा हा समाज, आक्रमकांच्या जीवनशैलीचे 'अनुकरण' अपरिहार्यपणे करू लागला. याआधीही इजिप्त आणि युरोपमध्येही असेच घडल्याचे आपल्याला दिसते. युरोपमधील प्रबोधनाच्या उत्तरकाळात त्यांनी आपल्या विकासाच्या सर्व मूळ संकल्पना ग्रीक संस्कृतीत शोधणे काय; किंवा पारतंत्र्यातील आणि आजच्या भारतीयांनी आपल्या वैदिक किंवा वैभवशाली इतिहासामध्ये अगदी आजच्या विज्ञानाच्या मूळ संकल्पना शोधणे काय, ह्या दोन्ही 'प्रतिक्रिया' सारख्याच आहेत. यामध्ये जेव्हा तारतम्य सुटते, तेव्हा अशा अभ्यासातील संशोधन संपते आणि ते एक हास्यास्पद स्वरूप घेते. पण म्हणून असा शोध घेणे म्हणजे ते संशोधन नाही, किंवा 'गुन्हा' आहे असा समज करून देणेही विज्ञानाच्या इतिहासाकरता मारकच ठरते.

आज भारताला स्वतंत्र होऊन ६७ वर्षे झाली. तंत्रज्ञानामुळे केव्हाही नव्हते एवढे जग एकमेकांच्या जवळ आले, एवढेच नाही तर ते परस्परावलंबीही झाले. जुन्या सर्व पुराणकथा आणि धर्मग्रंथ बाजूला सारून १९५० साली आपण आपली एक नवीन घटना स्वीकारली. घटनेमध्येच समाजवाद, निधर्मीवाद हा आपण आपल्या सामाजिक आणि राजकीय संस्थांचा पाया बनविला. सरंजामशाही, घराणेशाही संपुष्टात येऊन लोकांनी लोकांसाठी चालविलेली आणि निवडलेली, संख्याबळावर आधारित लोकशाही आपण स्वीकारली. सर्वांना समान संधी मिळावी म्हणून जातिव्यवस्थेवर आपण कायद्याने बंदी आणली.

दुर्दैवाने साम्राज्यशाहीने केली नाही एवढी भयावह परिस्थिती स्वतंत्र भारतात आज आपण करून घेतली. जातिनिर्मूलनाऐवजी गेल्या पन्नास वर्षांत आपण जाती घट्ट करण्याचे कार्यक्रम राबविले. भारत हा जगातील असा एकमेव देश असेल की त्यातील प्रत्येक जण आपण मागासलेले कसे आहोत हे आग्रहाने दाखविण्याचा प्रयत्न करताना दिसतो. जाट आणि मराठ्यांचे आरक्षण हा याचा परमोच्च बिंदू आहे. जाटांचे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविलेच आहे आणि मराठा आरक्षणाचेही तेच होण्याची शक्यता आहे. पण यांतले नागडे सत्य म्हणजे सगळ्याच राजकीय पक्षांनी आपली

सारासार विवेकबुद्धी गहाण ठेवून याचे केलेले समर्थन. एरवी प्रत्येक क्षणाला एकमेकांवर कुरघोडी करणारे राजकीय पक्ष, अशा मुद्द्यांच्या बाबतीत मात्र एक होताना दिसतात. प्रबोधनक्षमता तर दूरच राहिली, पण सत्तेकरता कुठल्याही थराला जाण्याची यांची मानसिकता, बुद्धी बधिर करणारी आहे. अर्थसंकल्प म्हणजे समाजातल्या घटकांना 'याचक' बनवून करायचा 'दानयज्ञ' असाच यांचा अर्थसंकल्पाबद्दलचा समज झालेला दिसतो. ग्रामीण-शहरी, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत अशा अनेक घटकांमध्ये समाजाला विभागून आम्हीच तुमचे तारणकर्ते आहेत हे दाखविण्याचा यांचा केविलवाणा प्रयत्नही आता सहनशीलतेपलीकडे गेला आहे.

गेल्या साठ वर्षांत लोकांनी पक्ष बदलून बघितले; पण पक्षांच्या 'राजकारणा'मध्ये मात्र त्यांना काहीच बदल दिसला नाही. समाजकारणाचे राजकारण, राजकारणात शिरलेली गुन्हेगारी आणि अनेक वेळा याचेही केलेले निर्लज्ज समर्थन; यामुळे सर्वसामान्य नागरिक हतबल झाला आहे. केंद्रापासून ते राज्य आणि गल्लीतील पक्षांमध्ये असलेली 'घराणेशाही' आणि त्या घराणेशहांच्या नवीन पिढीची वक्तव्ये, सरंजामशाही राहणीमान हे लोकशाहीत कुठे बसते हे त्या परमेश्वरालाच माहीत. गांधी, नेहरू, आंबेडकर, फुले, सावरकर, विवेकानंद ही सगळी मंडळी थोरच नाहीत; तर सगळ्याच भारतीयांना त्यांच्याबद्दल आदर आहे. आदर याचा अर्थ असा की, त्यांची शिकवण आपण थोडीफार तरी अमलात आणण्याचा प्रयत्न करणे, पण आजच्या राजकारण्यांनी त्यामध्ये 'अर्थपूर्ण' बदल करून जास्तीतजास्त भव्य आणि उंच पुतळे नि स्मारके बांधायला सुरुवात केली. गांधीजींचे सत्य, अहिंसेवरील प्रेम आणि वैयक्तिक जीवनामधील साधेपणा व नीतिमत्तेचा आग्रह यांबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. पण आजच्या गांधी अनुयायांच्या संपत्ती, वागणूक आणि राजकारणामधल्या कोलांट्याउड्या बघितल्या, की गांधीजींच्या पुतळ्यानेही अश्रू ढाळले तर आश्चर्य वाटायला नको.

सर्वांत भयावह परिस्थिती आहे ती आपल्या धार्मिक सणांची. गणपतिउत्सव असो, नवरात्र असो की दहीहंडी असो, त्यांचे आजचे 'रस्त्यावरचे' स्वरूप या सणांच्या पावित्र्यालाच नाही तर मूळ उद्देशालाही हरताळ फासणारे आहे. त्यांच्या आगमनापासून विसर्जनापर्यंतच्या मिरवणुकांमधील हिडीस नाच आणि फेविकॉलपासून, मुन्नी बदनामसारखी त्यांमध्ये वाजवण्यात येणारी गाणी पाहून, हे सण देवांचे आहेत की दानवांचे असा प्रश्न पडला आहे!! यांमध्ये नवीन नवीन सणांची भर पडते आहे. आता गुढीपाडवाही ढोल-ताशांनी त्यामध्ये सामील झाला आहे. या सगळ्या प्रकारांना सगळ्याच राजकीय पक्षांचा असलेला पाठिंबा आश्चर्यापेक्षा चीड आणणारा आहे. आजच्या आपल्या देवळांची भयानक परिस्थिती, गंगेपासून सर्वच पवित्र नद्यांचे आपण केलेले प्रदूषण आणि महाकुंभापासून अर्धकुंभामधील गोंधळ, अस्वच्छता आणि चेंगराचेंगरी, धर्ममार्तंडांच्या दिवाळखोरीशिवाय दुसरे काय दाखवतात?

हेच जर का या धर्माचे रक्षण करणारे असतील, तर हे परमेश्वरा, आम्हांला यांच्यापासून वाचव असे म्हणण्याची वेळ सर्व जनतेवर आज आली आहे.

●●●

(पृष्ठ क्र. २० वरून..**चमत्कार ...**)

मग कोण होता तो? दामाजीपंताच्या साहाय्याकरता विठोबा 'विठ्या महार' बनून आला होता, तसा भगवान योगेश्वर म्हाताऱ्याच्या रूपाने आला होता का? आला असेलही. पण शास्त्रीजींनी या घडलेल्या चमत्काराचे भांडवल केले नाही. माझ्या मदतीस प्रत्यक्ष योगेश्वर धावून येतो असा प्रचार केला नाही. आपल्या प्रवचनात वरील घटनेचा उल्लेखही केला नाही.

चमत्कार घडतात हे त्रैकालिक सत्य आहे. परंतु त्या चमत्कारांचे कर्तृत्व किंवा कारणत्व कोणा व्यक्तीने स्वतःकडे घेऊन लोकांची वंचना करणे योग्य नाही.

वस्तुतः महामना पांडुरंगशास्त्री हेच एक चमत्कार आहेत. त्यांचे विशाल कार्य हा एक महान चमत्कार आहे. पण ते कधीही तसे मानीत नाहीत. त्यांच्या बोलण्यात, प्रवचनात तसा उल्लेखही ते करीत नाहीत.

योगेश्वरावरील अविचल श्रद्धेने आणि निरहंकार वृत्तीने ते अविरत कार्य करीत आहेत, त्यामुळे सामान्यांना आकलन न होणारे प्रचंड (जवळजवळ गेल्या दोन हजार वर्षांत एवढ्या प्रमाणात न घडलेले) 'माणूस' घडविणारे कार्य होत आहे. खरोखरच हा फार मोठा चमत्कार आहे आणि त्याचे कर्तृत्व पांडुरंगशास्त्री आपल्याकडे घेत नाहीत. हाही मोठा चमत्कार आहे.

(जानेवारी १९९३ च्या अंकातून साभार.)

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४०० ६०१**

**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**

**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**

**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**

**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**

**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**

**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही - अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१